# डॉ. नितीन मोरे

## एकपात्री नाट्यछटा

# सांगतो ऐका



# सांगतो ऐका

(एकपात्री नाट्यछटा)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# सांगतो ऐका

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीला जात रहावा.

# सांगतो ऐका (एकपात्री नाट्यछटा)

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १६ एप्रिल २०१८

©esahity Pratishthan®2018

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

सांगतो ऐका (एकपात्री नाट्यछटा)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.


लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo. com


डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि



डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
प्रेमातुराणां


डॉ. नितीन मोरे
संवादोनी
प्रकटावे


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२


डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स

# दहाव्या प्रकाशनाच्या निमित्ताने..

डॉ. नितीन मोरे




ई साहित्य वरील हे माझे दहावे, नाट्यछटांचे पुस्तक हाती देताना आनंद होत आहे. दिवाकरांच्या नाट्यछटांतून उपरोधाची वेगळी पद्धत दिसायची. तीच येथेही दिसावी..

बोले तैसा चाले ही आदर्श व्यवस्था झाली.. ती काही माणसाची खासियत नाही! खरेतर तसे झाले असते तर व्यंगचित्र आणि व्यंग्यलेखकांवर संक्रांत आली असती. पण मनुष्य प्राणी तसा दयाळू आहे या बाबतीत आणि सढळ हस्ते तो लिखाणास विषय पुरवीत असतो! माझ्या आधीच्या बहुतांश लेखनात त्यांचे contribution खूप आहे.

मुळात एखादी बातमी वाचताना किंवा एखादा प्रसंग घडत असताना त्यामागे म्हणजे पडद्यापाठीमागे काय घडू शकते हे कल्पनेत बघायची खोड आहे मला. व्यंगचित्रे काढता आली असती तर लिखाणाच्या वेळखाऊ फंदात नि छंदात पडण्याची गरज पडली नसती.. पण चित्रकला नि माझा आकडा छत्तीसचा.. तेव्हा मी माझ्याच सुपीक डोक्यातून माझ्याच मनातल्या व्यंगचित्रांवर लिहायला सुरूवात केली. त्यातूनच माझे बहुतेक लिखाण झाले आहे. चक्रमादित्याचा

दरबार .. भाग एक आणि दोन किंवा शीर्षासन.. नाच जमुरे.. मच्छर टाइम्स.. वगैरे यातूनच लिहिले गेले.

लिखाणातून म्हणा की विसंगती दाखवण्यातून म्हणा ..काही बदलेल अशी अपेक्षा नाही ठेवता येत. फक्त आपण आपला एक दृष्टीकोन वाचकांसमोर ठेवत असतो..काही अंशी त्यातील कोणास तो पटला तरी पुरे एवढी माफक अपेक्षा करून.

असे असले तरी लिखाण मनाला आनंद देते. कित्येक वर्षे स्वांत सुखाय लिहित आल्यानंतर कोणी वाचक भेटेल तर बरे असे वाटू लागले. ई साहित्यच्या रुपाने हा world wide platform मिळावा या सारखी आनंदाची बाब कोणती असणार?

ई साहित्य ही मराठी भाषेच्या वृद्धीसाठी अलीकडील काळात झालेली सर्वात उत्तम गोष्ट असावी. मराठी नि तिच्या तथाकथित ऱ्हासाबद्दल गळे काढत बसण्यापेक्षा सकारात्मक दृष्टीने पुस्तके प्रसिद्ध करून वाचकांपर्यंत पोहोचवणे ही मराठी भाषेची मोठी सेवा ई साहित्य करीत आहे. विविध विषयांवरील पुस्तके आणि त्यांचे अत्यंत देखण्या स्वरूपात प्रकाशन ही ई साहित्याची वैशिष्ट्ये म्हणता यावीत..

ई साहित्याच्या रूपाने माझ्या अमृताहूनी गोड भाषेने तिन्ही लोकी झेंडे गाडावेत हीच सदिच्छा!

# डॉ. नितीन मोरे यांच्या दहाव्या पुस्तकाच्या निमित्ताने

ई साहित्य प्रतिष्ठान दहावर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi book” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची दहा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा पुस्तके वाचकाची वाट पहात होती. त्यांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष

ई साहित्य प्रतिष्ठान

या सर्व नाटिका, व त्यातील व्यक्ती, नावे, पात्रे, पत्रे, योजना काल्पनिक आहेत आणि यांचा कोणाही जीवित वा मृत व्यक्तीशी साम्य आढळल्यास कुणाकडे बोलू नका.

योगायोग असतात!

दुसरं काय!

# सांगतो..  ऐका!

## ( आणि इतर नाट्यछटा )

लेखक:
डॉ. नितीन मोरे

अनुक्रमणिका

१. सांगतो .. ऐका!
२. घेलाशेटची खंत!
३. आई जगदंबे!
४. स्वागत... नकुशीचे!
५. नव्या मनूचे स्वागत!
६. तुम्हांला सांगतो..
७. मी म्हणतो..
८. भांडण!
९. मी आज्ञाधारक मुलगा बोलतोय
१०. साहेबांचे स्वागत
११. वरदक्षिणा
१२. लक्ष्मीची पावले..
१३. ऐकलंत काय?
१४. नाही, मी येणार नाही!
१५. आमची भूक परिषद
१६. द्या टाळी!
१७. मी म्हणजे मी आहे!
१८. लय मागणे नाही!
१९. भो.. भो.. भो..
२०. मी पिंजऱ्यातला राघू ..
२१. भाऊ आणि बहीण..
२२. जय जय रामकृष्ण हरी ..
२३. मी आणि माझे नशीब!
२४. आले महाराज..!
२५. बैठक!
२६. ऐका ना माझे जरा..
२७. माझ्या कवीमनाची व्यथा!

२८. मी आणि चूक.. अशक्य!
२९. मुखवटा आणि चेहरा
३०. चिंग्या महिन्याचा होत नाही तोच!
३१. मी एक फायटर

# अर्पणपत्रिका

साहित्यिक दिवाकरांच्या स्मृतीस
सादर अर्पण

**प्रस्तावना**

दिवाकरांच्या नाट्यछटा मराठीत प्रसिद्ध आहेत. एखाद्या विषयावर मार्मिक टिप्पणी, त्यात विसंगती आणि उपरोध हा नाट्यछटांचा मुख्य गाभा.

एकूणच या नाट्यछटा छोटेखानी असूनही तो मुद्दा पटवून देण्यात यशस्वी ठरतात.
अशाच काही नाट्यछटा लिहिण्याचा हा प्रयत्न. यात काही वैयक्तिक पातळीवरचे साधेच विषय आहेत तर काही सामाजिक- राजकीय.

माझा मुद्दा पटवून देण्यात मी किती यशस्वी झालोय ते वाचकच ठरवतील.

डॉ. नितीन मोरे

१

**सांगतो .. ऐका!**

काय कसे काय?

ठीक आहे ना?

नाही दिसलात खूप दिवसांत म्हणून..

काय?

तुम्ही होतात नि मीच पाहिले नाही?

असे कसे शक्य हो?

माझी चूक कधी होते का?

माझे ध्यान असते सगळीकडे. चौफेर अगदी! काय ! अगदी बकध्यान! साधेसुधे नाही. पण मासे बिसे नाही पकडत मी.. पक्का शाकाहारी ना! उगाच ते मच्छीमटण आणि अभक्ष्यभक्षण कशाला? छे छे .. खरे तर शिव शिव.. आणि तुम्ही पण नका खाऊ.. का? मी सांगतोय म्हणून. वाईट हो ते मांसमटण.. वाईटावरून आठवले..

माझे एक आहे.. सांगतो.. जोवर मी चांगला आहे ना तोवर चांगला.. वाईट तर वाईट.. मग माझ्यासारखा वाईट कोणी नाही.. सांगून ठेवतो.. तरीपण माझे नियम आहेत.. कोणाला गाफील ठेवून त्याच्यावर हल्ला नाही करत मी.. काय आहे माझ्या तत्वात नाही बसत ते. तर ते माझे मलाच म्हणजे मनास घालून घेतलेले कुंपण आहे ते.. मी त्याबाहेर नसतो जात. मी नियम काटेकोर पाळतो.. माझा तो उसूलच म्हणाना. तर सांगत तेच होतो हो.

ऐकताय ना?

तसा मी स्पष्टवक्ता आहे.

माझ्या स्वभावातच असला स्पष्टपणा.. उगाच आत एक बाहेर एक नाही.

कुणी त्याला फटकळपणा म्हणाले तरी बेहत्तर.. त्यामुळे कोणास राग येवो .. मला नाही पर्वा त्यांची.  का मी करावी पर्वा? अरे कर असेल तर डर ना? माझे मी म्हटले ना नियम.. म्हणजे एक शिस्त हो .. तर मी ठरवून घेतलेय.. काही गोष्टी करायच्या नाहीत म्हणजे नाहीत. म्हणजे मी त्या करत नाही.. शेंडी तुटो की पारंबी मग!

असे आहे माझे..

एकदा ठरवले की ठरवले..

मग मी कोणाच्याही बापाचे नाही ऐकत.. माझे मलाच कौतुक वाटते..

म्हणजे मी असा आणि इतका परफेक्ट कसा?

तसा मी चांगल्याशी चांगला आहे पण कोणी आडवा आला ना तर.. तर मात्र तो आहे नि मी आहे.

मग मी चार हात करेन..

मागे हटत नाही मी..

का हटावे?

माझी बाजू सत्याची असताना मी का हटावे मागे?

माझे म्हणणे एकच आहे..

माझी कदर केली नाहीत तर माझे काहीच बिघडणार नाही. पण माझे ऐकून ठेवा..

माझी कदर न केल्यास पस्तावाल एक दिवस..

माझे काय बिघडणार? मला काही तसूभरही फरक नाही पडणार.

माझ्या इतक्या सांगण्यानंतरही तुम्ही मानत नसाल तर.. नाईलाज आहे माझा.  मी सत्यवादी आहे..

मी कोणत्याही गोष्टीसाठी आकाशपाताळ एक करू शकतो. जिवाची बाजी लावू शकतो..

जिद्दी आहे मी ..

तुम्ही ऐकताय ना? की कान बंद करून बसलाहेत? मी सांगतोय नि तुम्ही.. गप्पच!

ऐका की नका ऐकू..

मला त्याचे काय? मी सांगतो..

मी त्या साऱ्यापलिकडे गेलोय..

माझे सारे काही वेगळे असते.. मी सांगतो ना..

काय हे.. मी बोलतोय नि तुम्ही काही बोलत नाही.. मीच एकटा बोलतोय..

काय? मी बोलू देत नाही? कायपण तुमचे..

मी.. माझे .. मला.. माझ्यासारखे.. माझ्यासाठी.. मी सांगतोय म्हणून.. ऐकावे तर लागेलच.. मी म्हणतोय ना .. ऐका ..

२

**घेलाशेटची खंत !**

हे लोग कशाला धावते कलते नाय..
साला आम्ही लोक स्पॉन्सर करते .. तरी पन..

झाला काय की पोरा लोग आली पैसा मागायला. मी म्हणाला, कसला पैसा? पोरा लोग एकदम होशियार.. बोलली, शेटजी, तुमी एवडा मोठा बिजिनेसमन.. हे खरा.. चोकस एकदम.. बिजिनेस बी हाय आन मोठा बी हाय.. अने मी शेटजी बी हाय.. तर पोरेलोग बोलते त्यात चूक काय नाय.

तर पोरा लोग बोलले, कॉलेजमदे फंक्सन हाय.. तेचा स्पॉन्सरशिप हवा.. बोलले जे मोठेमोठे लोग असतात त्याकडे मागतात फकस्त. मी म्हणाला, हे पन साला खराच हाय.. घेला, घेला आन सन्स केवडी मोठी हाय.. मोठा बिजिनेस हाय.. पोरा लोग खोटा कशाला बोलतील?

तसा माज्या हातून पैसा निघते नाय.. पण पोरा लोगने पायला ने माजा जुना दिवस आटवला. साला चांगला मार्क मिळाला तर मी पण गेला नसता काय कॉलेजमदी? धावी नंतर बापाने चिकटवून टाकला दुकानमदी.. तेचा काय नाय.. ते बिजिनेस आपल्या रगतमदी हाय. पन ते पोरा पोरी फिरताना पाहते ना तर वाटते.. ते दिवस पन साला आपल्या आयुष्यमदी यायला पायजे होते. जाव दे.. असा पन तो परीक्षा नि तो अभ्यास आपल्या काय बोलते ते.. बस की बात नही.. पन आपला बिजिनेस मोठा हे खरा.

तर पोरांना बोलला.. हे घेलाशेट कडून पैसा काडने मुश्कील पन साला जुन्या दिवसाची याद करून दिली.. दिला तुमा लोगाना पैसा. पन घेला अन घेला ला काय मिळेल? पोरा लोग होशियार.. बोलले, शेटजी लावून टाका जाहेराती.. तर अशे झाला.. जाहेरात आमची.. बोर्ड लागला आमचा.. घेला, घेला अन सन्स.. पोरा पोरी बोलवायले आली.. म्हणले, शेटजी यावा तुमी.. मी म्हणला त्यामुले कॉलेजमदी तर जाता यील.. जवानीत कदी नाय गेला.. डायरेक गल्ल्यावर बसवला बापाने तवा.

तर म्हनून आमी या कॉलेजमदी आला.. चोकस सगला.. बोर्ड चकाकते समदा.. काय ते शायनिंग.. पोरा लोगाची फुटबॉलची मॅच हाये.. तिचा स्पॉन्सर आमी लोग. हून जाऊ दे..

पन हे लोग समदे एका बॉल मागे धावते.. हे बरोबर नाय.. एक तर साला धावायचाच कशाला.. आनि आदी बोलते तर एकेक पोराला एकेक बॉल नसता दिला.. दर बॉल वर घेला अन घेला लिवून.. कसली जाहेरात जाली असती..

जाव दे.. नेक्स टायम .. आन काय!

३

**आई जगदंबे !**

देवी माते! शरण आलेय गं मी तुला.
शरण म्हणजे नाक घासून.. पदर पसरून. तू शक्तीची देवता..
तू विद्येची देवता..
तू धनदेवता..
तू देवतांची देवता..
तू शिवाची शक्ती..
तू गौरीची भक्ती..
तू विद्यालक्ष्मी..
तू धनलक्ष्मी..
तुझ्यापुढे पदर पसरते गं आई..

तू आई..
तू जगदंबा..
तू भवानी..
तू लक्ष्मी..
तू सरस्वती!
तू अखिल ब्रह्मांडाची जननी..
तू जन्मदात्री..
तू रक्षणकर्ती..
तुझ्यापुढे नतमस्तक मी.. मी एक पामर गं या जगातली.. आता तूच हाती घे गं..
तूच आई हो माझी..
सारे काही तूच करशील गं..

फार मागणे नाही जगन्माते..

माझी ती सुलू आहेना.. तिला फक्त चांगला वर मिळो.. मला जावई मिळो चांगला इतकेच बरे मागणे..

म्हणजे आई तू पाहतेस ना.. माझा मोठा.. तोच रमेश.. लग्न झाले नि बायकोच्या कह्यात गेला. ताटाखालचे मांजर जणू..! आता दैव आमचे! त्यातून कोणाची सुटका बरे? रमेश माझा चांगलाय गं.. साधासुधा आणि सरळमार्गी.. त्याला या सटवीने फितवले.. सटवी कसली.. काळतोंडी.. काय सांगू त्या भटकभवानीचे कर्तूत आई? माझ्या रम्याला वेगळा गं केला तिने.. आता दोघेच कसे राजा राणी! त्याच्या पगारावर डोळा हिचा गं.. अडचण होते म्हणे माझी.. काळतोंडी!

पण मी तुला काय सांगायचे तेच विसरले.. त्या सटवीचे नाव काढले की असेच होते काय करू? तिळपापड होतो..
तर माझ्या सुलूला चांगला जावई दे.. म्हणजे तिला चांगला नवरा नि मला जावई दे.. फार काही नाही. .
चांगला कमावता दे ..
सुलूच्या मुठीत राहिल असाच दे.
आणि त्याचे घर.. वेगळे असेल तर बरे.. बरे कसले उत्तमच! उगाच माझी सुलू बिचारी त्याच्या म्हाताऱ्याम्हातारीत अडकून पडायची!
जावई कसा माझ्या गरीब गाई सारख्या सुलूच्या कह्यात राहिल असा दे गं..

ऐकतेस ना आई जगदंबे.. तशी तू आहेसच सर्व ज्ञानी..
आई जगदंबे..
शक्तीदायिनी..
वरदायिनी.. माते!

फार काही मागणे नाही!

४

## स्वागत .. नकुशीचे!

देवा.. काय ही अवकृपा रे..
किती ही निष्ठुरता..
किती ही निर्दयता ..
काय बिघडवले रे आम्ही तुझे?
की आमचेच गेल्या जन्मीचे पाप?
आणि विसरलास तो आम्ही केलेला नवस?
ते उपासतापास अन नवस सायास?
तुझ्या दारी ते नाक घासणे.. तुझ्या झिजवलेल्या पायऱ्या..
देवळातल्या देवा.. विसरलास .. गाभाऱ्यात बसवलेला तो संगमरवरी दगड..
नित्यनेमाने केलेली पूजा अर्चा..
तुझ्या नावे घातलेली जेवणे..
दर मंगळवारचे ते अनवाणी दर्शन..
नैवेद्यात दाखवलेले ते सुग्रास गोडधोडाचे भोजन..
रोज आरतीच्या वेळेस न चुकता वाजवलेल्या घंटा आणि बडवलेले ढोल..
गणपतीत न चुकता वाहिलेला भंडारा .
तुझ्या उग्र रूपास शांत करण्यास कापलेला बोकड
काय काय रे दिले नसेल तुला आम्ही?
तुझ्या दरवाजात टांगायला सोन्याची घंटा .. तुझ्या गाभाऱ्यातला नंदादीप..
अस्सल चांदीचा.
सात मंगळवार खास गोडाचा नैवेद्य..
अरे इतके कमी होते रे तुला?
की तूही माणसासारखा हपापलाय..
काही नाही तर मागून घ्यायचंस..

नाही म्हटले असते का तुला?

तुझ्याच दयेने नि आमच्याही कर्तृत्वाने .. काही कमी नाही रे..

जे कमी ते मागितले.. तर तू दुर्लक्ष करावेस?

अरे किती पाहिलेली स्वप्ने..
किती बनवले मनसुबे..
किती रचले मनोरथांचे मनोरे..
आमची गादी चालवायला वारस..
तो येईल.. चालवेल गादी ..
अर्थ देईल आमच्या अस्तित्वाला..
अन शेवटच्या दिवशी दाखवेल मुक्तीची वाट..
पण नाही..
इतके करून ही अवदसा..

का पदरात घातलीस ह्या नकुशीला?

पाहिलेस किती तो निरागस जीव..
पण

काय कामाचा..?

झाला देवा आत्मा शांत?

घातलीस ही पोरगी पदरात..
पण नाही..
तुम्ही सर्व शक्तिमान..

वर दयाळू म्हणून मिरवणारे.. झाले समाधान?

झाला आत्मा शांत? तुला आत्मा आहे की नाही, नाही ठाऊक.. पण..

दुसरा कोणी असता तर हडसून खडसून विचारला असता जाब.. कुठे फेडशील हे पाप म्हणून..

पण तुला असे विचारायची पण नाही रे सोय ..

एकूण जे केलेस ते बरे नाही केलेस देवा एवढे सांगून ठेवतो आणि काय..!
पहिली असेल धनाची पेटी .. पण ही दुसरी आहे..

हाय रे देवा आणि दैवा!

५

**नव्या मनूचे स्वागत!**

या मंडळी..
स्वागत आहे..
म्हणजे तसे म्हणतात म्हणून.. स्वागत.. सुस्वागतम्..
पण खरे सांगतो .. तुम्हाला पाहून.. तसे दिसताय बरे.. भाषा कुठची तुमची.. बोलाल तेव्हा कळेलच.. एकूण अवतारातून .. आमच्यातले वाटत नाहीत.. आमच्यातले म्हणजे..गैरसमज नको.. चतुष्पादातले नाहीत.. मनुष्यप्राणी.. इतपतच आमच्यातले असून नाही चालणार..
काय आहे ना.. तुम्ही कोण कुठले कुठल्या प्रकारचे वगैरे कळणे गरजेचे आहे..
म्हणजे मोठमोठी माणसे बोलत आली .. म्हणजे सांगून गेली.. मानव तितका एकच आहे..मी काय म्हणतो.. आहे ना एक.. मानव तितुका मेळवावा.. हे ही म्हणतो .. पण सृष्टीचा साधा नियम आहे हो..
एका माणसाचा डावा नि उजवा.. दोघातही डावे उजवे असते.. थोडी जुळी सोडली तर एक माणूस दुसऱ्यासारखा नाही. मानव सगळा एक आहे म्हणा.. पण ते दोन हात.. दोन डोळे.. दोन नाक.. सॉरी.. एक नाक.. वगैरे पुरता.
थोडा मोठा कॅनव्हास घेतला ना तर कळेल..
हे जे सिंहासनावर बसतात ते अधिक मोठे असतात.. जास्त मानवी म्हणाना.. ते जे राब राब राबतात.. ते घामेजल्या शरीरांचे.. मळक्या अंगांचे.. फाटक्या कपड्यांतले.. खिशात दमडी नसणारे.. ते कोणत्या कोनातून त्या सिंहासनावरील राजाधिराजांशी बरोबरी करू शकतील?

तेव्हा माझे म्हणणे इतकेच..
या तुम्ही.. स्वागत आहे.. पण तुम्ही आमच्यातले आहात की नाही.. तेवढे सांगा.

आमचे द्रष्टे पूर्वज..

त्यांनी किती दूरदृष्टी दाखवली..
त्यांनी कशी सिस्टीम बनवली..
ती कालातीत आहे.. तुम्हाला माहितीय ,  विज्ञानातही अशी classifications असतात. म्हणजे तेवढे तुम्ही शिकलेले असलात तर पटेल तुम्हाला मी काय म्हणतोय.. अहो मोठमोठे शास्त्रज्ञ.. सगळ्याच गोष्टींचे वर्गीकरण करतात. साध्या पाण्याच्या त्यांनी तीन अवस्था आहेत म्हणे! बर्फ.. पाणी आणि वाफ! साध्या पाण्याबद्दल हे तर बाकीच्यांचे काय?

थोडक्यात काय माणसाचे वर्गीकरण केलेच पाहिजे.
आणि आमचे ते पूर्वज द्रष्टे होते! त्यांनी नुसतेच चार वर्ण नाही बनवले तर त्याच्यात ही उपविभाग केले त्यांनी.
कुणी ब्राह्मण झाला तर कुणी क्षूद्र.. ज्याच्यात्याच्या जन्मावर अवलंबून.
किती शास्त्रशुद्ध!
त्यात काही नतद्रष्ट हे पाळत नाहीत म्हणे.. पटत नाही म्हणतात.. न पटो..

पण शतकानुशतके टिकलेली ही व्यवस्था.. अजूनही टिकलीच पाहिजे..
टिकवलीच पाहिजे! आणि मला खात्री आहे आपल्या समाजाच्या पुढारलेपणाची..
ही व्यवस्था टिकणारच!

तर सांगा.. जात कोणती तुमची?
मनू जुना असो की नवा.. ती जात महत्वाची.
तर तुम्ही आमच्यातलेच ना?
असाल तरच स्वागत इथे..
हे नव्या मनूचे स्वागत!

६

**तुम्हांला सांगतो..**

काय सांगू तुम्हांला.. अहो जिथे नुसता भ्रष्टाचार बोकाळलाय.. म्हणजे मीच नाही .. सारेच म्हणतात तसे.. जिथे पहावे तिथे भ्रष्टाचार.. भ्रष्टाचारच भ्रष्टाचार.. आणि मला तिटकारा  वाटतो नुसता विचार केला तरी.. तुम्हांला सांगतो..

तुम्हाला सांगतो..
साधा चपरासी हो.. किती कमावत असावा? कुठे नि कुठल्याही ऑफिसबाहेर असो.. आतील माणूस किती पॉवरफूल त्यावर याचीही पॉवर अवलंबून असते. आणि सांगतो ते PWD.. कुरण हो चरणाऱ्यांचे.. म्हणजे काय की माझ्या मुलीला.. तशी शिकलीय चांगली.. BA झालीय चांगली.. दोनदा फेल झाली बारावीत पण त्या पत्रकाराची ओळख निघाली.. पेपर आणला फोडून तेव्हा कुठे लागली नैया पार! पण BA? स्वत:च्या हिमतीवर झाली हो.. म्हणजे टायपिंग करायची.. त्या नोकरीतून साठवलेले  पाच हजार .. त्या जोरावर झाली बीए पास! तर तिच्यासाठी शोधला तो कुणी PWD वाला.. काय आहे थोडा हुंडा जास्त द्यावा लागला तरी वरकड कमाई असली तर पोरीला आयुष्यभर ददात नाही.. सुखात राहील!

तर सांगत होतो त्या भ्रष्टाचाराबद्दल. किती बोकाळलाय सगळीकडे..
काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.. साधे रेशन कार्ड ते काय.. आम्हा दोघांबरोबर माझ्या आईचे नाव घालायला बक्कळ दोन हजार? काही नीतीमत्ता? तेव्हा माझी आई जिवंत नव्हती हे खरे .. सुटली बिचारी असले दिवस पाहण्यापेक्षा.. पण तिला मिळून मिळून किती साखर मिळाली असती रेशन वर ? पाव किलो?

त्यासाठी दोन हजार? जाऊ दे झाले.. या भ्रष्टाचाराचा असला तिटकारा आलाय सांगू..

पण तुम्हाला सांगतो ..
त्या राजकारण्यांनाच विचारायलाच हवा हडसून खडसून जाब.. कोटीने पैसे खातात हो.. नाही.. खा तुम्ही पण काही धरबंद..आम्ही इथे .. म्हणजे आमचे ऑफिस सरकारी .. इथे आम्ही हजारांत कामे निपटवतो.. तुम्ही कोटीच्या कोटी उड्डाणे घेता? तुम्ही नि आम्ही सरकारीच ना? नीतीमत्ता चीज राहिली नाही तुम्हाला सांगतो..

अजून काय काय बोलणार? कोळसा उगाळावा तितका काळाच हो.. खरे सांगतो.. अगदी तिटकारा तिटकारा वाटतो.. या भ्रष्टाचाराचा..
थांबा जरा हा फोन घेतो..
कोण? पाटील? हां.. बोलतोय.. नाही हो .. नाही नाही.. अडीच मध्ये ? नाही.. पाच कमीतकमी.. अहो फाईल हलवायचीय.. खायचे काम आहे काय ? आम्हाला पण वर द्यावा लागतो.. जाब.. साडेचार फायनल .. त्याहून कमी नाही.. नाही हो.. पैसे घेऊनही कामे न करणे आमच्या ethics मध्ये नाही बसत. या तुम्ही..

तर मंडळी.. निघायला हवे..
आम्ही कामाची माणसे.. सरकारी दप्तरे आमच्या शिवाय चालतात होय?
तुम्हांला सांगतो..

७

**मी म्हणतो..**

माझा मुद्दा तोच आहे.
म्हणजे असे की तुमचेही म्हणणे एकूण तेच आहे म्हणाना!
म्हणजे असे ..
की आपल्याला या बाबतीत मतभेदास वाव नाही.
काय आहे ...
मतभेद ही मनभेदाची पहिली पायरी आहे.
कोण म्हणतो असे?
कोण कशाला हवे म्हणायला..
मीच म्हणतो असे.
खरेय की नाही सांगा..
हो की नाही?
पण आपल्याकडे ना कोण म्हणाले हे काय म्हणाले याहून महत्त्वाचे असते.
तरी पण ऐका..
मीच म्हणतो हे असे..
तर आपल्यात मतभेद नाहीत नि मनभेद तर त्याहूनही नाहीत!
खरंय की नाही?

काय आहे ना काही जणांना सवय असते की कुणा कुणाचे काही ऐकून घ्यायचेच नाही.. मग त्याला ते मतभेदाचे नाव देतात. मतभिन्नता म्हणे..
एवढ्यावर थांबतात का हे येरू..
तर नाही!
याला ते लोकशाही म्हणतात म्हणे!
ही असली असेल का लोकशाही?

मी म्हणतो एखादी गोष्ट दोन वेगवेगळया लोकांना वेगळी कशीकाय दिसू शकते?
एका प्रश्नास उत्तर एकच .. सॉरी.. बरोबर उत्तर एकच एक असू शकते.. हो की नाही?
नाही म्हणजे इथे तुम्ही नाही म्हणण्याचा प्रश्नच येत नाही..
कारण
हे एक सत्य आहे..
हेच एक सत्य आहे..
आणि हे एकच सत्य आहे!
आणि हे एक सत्यच आहे!

थोडक्यात काय ज्यांना माझे म्हणणे नाही पटत ते अर्थातच चुकतात कुठे तरी!
अहो मी कधी चुकू शकतो का म्हणता?
अर्थात नाही..
अर्थातच नाही
आणि
अर्थात नाहीच!

थोडक्यात काय जे जे माझ्याशी सहमत नाहीत ते सर्व चुकीचे आणि
तुमच्यासारखे जे सहमत
ते बरोबर
आणि
तेच बरोबर!
बरोबरच आहे ..
काय आहे..
माझे म्हणणे असे की माझ्याहून कोणी समाज वा देशहित वा अहिताचा विचार करू शकतो का चांगला?

कुणीच नाही ना?

कसे काय करणार ते?

अहो ज्यांना त्यांना स्वार्थ सुचतोय.. आणि मी परमार्थाची परिसीमा!

कोण म्हणतो असे?

कोण कशाला म्हणायला हवे?

हातच्या काकणांला आरसा कशाला?

तर एकूण काय तर ...

मी म्हणतो ते खरे ..
मीच म्हणतो ते खरे..
मी म्हणतो तेच खरे..
आणि
मी म्हणतो ते खरेच!

खरंय की नाही?

८

**भांडण!**

काय भांडलाय म्हणून सांगू तो! माझ्याशी!
भांडण काही नवीन नाही!
गेली कित्येक वर्षे ..
त्याचे नि माझे भांड्यास भांडे लागले नाही असा दिवस जात नाही.

कारण.. ते विचाराल .. तर
काहीही कारण पुरते आम्हाला.
काय आहे घर आहे ..
तर भांड्याला भांडी लागायचीच..
फक्त काचेची नसावीत एवढे पाहिले की पुरे.. हे जरा गंभीर झाले..
म्हणजे भांडणे .. कोणत्याही विषयावरची असोत.. आम्ही गंभीरतेनेच करतो..
आणि एक..
चूक अर्थातच त्याची असते..

तसा आम्ही अलिखित नियमच बनवलाय म्हणाना..
म्हणजे वादावादी होते..
भांडाभांडी होते..
शब्दाने शब्द वाढतो..
आमची ती भांडण शक्ती आम्ही पणाला लावतो..
जाता जाता सांगायला हरकत नसावी.. कुठल्याशा मशीन च्या ताकदीचे एकक अश्वशक्ती असते म्हणे.. तसे हे मी शोधलेले एकक.. भांडणशक्ती!
तर आम्ही पणास लावतो ती..
खरे सांगते ..
कधी कधी कि नाही त्याचा मुद्दा बरोबरही असतो.. असू शकतो! मला पटू शकतो..

मग मी सावधान होते! सावधान म्हणजे अति सावधान!
माझा मुद्दा बरोबर असताना फार काही करावे नाही लागत.. पण तो बरोबर असेल तर..
एक आसमानी संकट म्हणा!
माझे सारे कौशल्य यावेळी पणास लावते मी!
त्याचे काय..
काही असले तरी तो संवेदनशील आहे.. तुम्हाला गुपित म्हणून सांगायला हरकत नाही.. बोलू नका कुठे.. त्याला तर मुळी कळूच नका देऊ.. तो फार चांगला ही आहे! त्याच्या आधारावर मी काही करू शकते.. म्हणजे कुठलेही भांडण जिंकू शकते मी!

आजवर माझा रेकॉर्ड आहे म्हणाना!

माझ्याकडे एक असा स्पेशल .. सेन्सर म्हणा आहे.. मला कळते .. त्याची बाजू वरचढ आहे .. असे क्वचित होते.. तर माझी अस्त्रे कामी येतात..
एक तर मी विषय बदलते ..
मग दहा वर्षांपूर्वीची त्याची चूक.. त्याची आठवण!
त्यात परत सासरची मंडळी असतातच .. मदतीस! त्यांच्या एकेक दुर्गुणाचा पाढा सुरू केला.. ते दुर्गुण खरे असायलाच हवेत .. असेही नाही .. की हा defensive व्हायला लागतो ..
पण सांगू कधी कधी हा खरेच नाठाळपणा करतो.. नाठाळ म्हणजे.. नाठाळ!
कुठलीच ट्रिक काम देत नाही ..बच्चमजी चक्क मौन व्रतधारक होतात! अबोला!
मग मी माझे ब्रह्मास्त्र काढते!
देवाने छान अश्रूग्रंथी दिल्यात.. त्याचा वापर!
त्या अश्रूपातात कुणीही वाहून जायलाच हवा! मग याची तर गोष्टच नको!

थोडक्यात काय प्रसंग बाका .. तर काम येती या अश्रूधारा..

मग काय .. बच्चमजी आपली नसलेली चूक मान्य ना करते झाले तर नवल!

खरे सांगू..
त्याच्या बोलण्याचा इतका त्रास होत नसेल तितका त्या मौनाचा होतो! बोलत नाही म्हणजे काय!  त्यानेच धरला अबोला तर पुढचे भांडण कुणाशी करावे? निदान त्या साठी तरी .. तू बोलत रहा..

आणि चूक तुझीच हे विसरू नकोस कधी..!

९

**मी आज्ञाधारक मुलगा बोलतोय..**

काय? मी आणि चॉकलेट? नाही हो.. चॉकलेट खाल्ले मी .. म्हणजे खाल्ले नाही असे नाही.. तसा दोनदा थम्सअप प्यायलो.. आणि एकदा मिरिंडा पण. आणि दोनवेळा आईस्क्रीम.. पण तेही की नाही माझ्या फ्रेंडसनी जबरदस्तीने खाऊ घातले म्हणून!

तुम्हाला ठाऊक आहे ना मी किती आज्ञाधारक आहे ते? गेल्या बारा दिवसांत .. नाही वर्षात.. मी कधी तुमचे ऐकले नाही असे दिसले कोणाला? बाराहून जास्त नाही म्हणता येत कारण माझे वयच आहे तेवढे! तर मी कधी तुमचे ऐकले नाही असे झालेय का? नाही ना? कसे दिसणार? कारण तुम्ही मला हल्ली सांगणे सोडून दिलेय.. आई म्हणते, सांगून उपयोग नाही.. आणि बाबा.. त्यांचे कुठे लक्ष असते घरात नि माझ्याकडे?

शाळेतून बाई पाठवतात माझ्या एवढ्या तक्रारी.. त्या ऐकायला आलेत कधी बाबा? बिचारी आई महिन्यात एकदा तरी येतेच शाळेत. मागच्या महिन्यात तर बिचारी तीनदा आली.

एकदा काय तर झाडावर चढून चिंचा काढल्या म्हणून. आता आईला काय सांगायचे त्यात? असा पण तो जोशीसरांचाच पिरीयड होता. एकतर सर एकदम बंडल शिकवतात. उगाच नाही मी गणितात काठावर पास होत! तर त्यादिवशी सरांनीच सांगितले.. तू इतरांना डिस्टर्ब करण्यापेक्षा बाहेर का जात नाहीस? गुरूची आज्ञा.. पाळायला हवीच. म्हणजे मी आईबाबा आणि गुरूजन यांची आज्ञा पाळतोच नेहमी. बाहेर थोडा कंटाळा आला म्हणून चढलो चिंचेच्या

झाडावर. ते झाड पण वर्गाबाहेरच आहे ना? सरळ गुरुजींची आज्ञा पाळली तर असला गहजब कशाला? आई पण वैतागली.. खरी तर ती त्या गुरुजींवर वैतागलेली.. पण शिक्षकांवर कसे रागावणार.. म्हणून माझ्यावर चिडली आणि काय! तर सांगू का ..या मोठ्या माणसांना कि नाही राग कुठे ना कुठे काढावाच लागतो. तर हे असे आहे बघा.

तर ते चॉकलेट नि थम्सअप नि आईस्क्रीम.. जबरदस्तीने कोणी खाऊ पिऊ घातले.. तर खावे प्यावे लागते. माझी आई बोललेली मला.. तिथे काही असले खाऊ पिऊ नकोस हां.. मी आईची आज्ञा कशी काय तोडेन? पण ते माझे मित्रलोक आले.. बळजबरीने .. म्हणाले.. खाऊन दाखव आईसक्रीम..आता कुणी असे ललकारले तर.. मी हरलो हे आईला आवडले असते का? ते थम्सअप.. या पोरांनी बाळजबरी खाली पाडून गळयात ओतले असते.. मी ओळखतो त्यांना नीट.. त्यात मला झाली असती काही इजा तर? आईला किती वाईट वाटले असते? तर अशा जबरदस्तीने माझ्यावर कसला बाका प्रसंग ओढवला म्हणून सांगू.. एवढे सारे केले मी आईच्या आज्ञेखातर आणि मी आईबाबांचे ऐकत नाही म्हणता तुम्ही? काहीतरी मला खावे लागले म्हणून?

तुमचे बरोबर आहे..
तुम्ही मोठे लोक.. आमचा मुलांचा चष्मा नाहीना लावत.. ठीक आहे तुमचे..
जातो..
कुठे काय?
त्या तिथे दूरवर केरकरांच्या अंगणात पाहिल्यात किती कैऱ्या लगडल्यात..
प्रॉमिस दिलेय मी बब्याला.. येतो म्हणून.. दिलेले प्रॉमिस तोडू? आईला किती वाटेल वाईट तसे केले तर..?
नकोच.. निघतो .. बाय!

१०

## साहेबांचे स्वागत

नमस्कार.. या या..
जरा प्रॅक्टिस करून घेतो..
ऐकताय ना? ऐकाच.
काय आहे आज आहे जंगी सभा..
जंगली नाही हो..
महासभा म्हणा हवे तर.. आजकाल सारे काही कसे महा असते.. नुसता गुरू नसतो हल्ली.. महागुरू असतो.. तसे.
तर सांगत काय होतो.. हां ..
त्या प्रॅक्टिसबद्दल होतो..
ऐका ..

मला ठाऊक आहे तुम्ही सारे आतुरतेने वाट पाहात आहात ज्यांची ते आता येतीलच. अगदी कुठल्याही क्षणी त्यांचे आगमन होईल.. तसा निरोप आलाय. साहेबांची गाडी निघालीय.. रस्त्यात आहेत साहेब. तोवर थोडी वाट पहा.. मला ठाऊक आहे तुम्ही दूरदूरवरून आलेले आहात. कुणासाठी? तर आपल्या साहेबांसाठी. भर उन्हात डोक्यावर तळपत्या सूर्याची उष्णता झेलत तुम्ही आला आहात ते साहेबांच्या जाज्वल्य आणि विचारसंपृक्त भाषणाने आपले कान तृप्त करून घेण्यासाठी. आपल्या साहेबांच्या विचारमौक्तिकांची ओढ तुम्हाला इथवर खेचून आणते. त्या विचारांच्या वर्षावात कुठल्याकुठे पळून जातो हा सूर्याचा उष्मा..

तर सर्वांचे स्वागत आहे.. काही थोडके असतात हौशे नवसे गवशे..आमच्या आदरणीय विरोधकांची सभा झाली इकडे नुकतीच. पन्नास रुपये पर हेड रेट होता गर्दीचा! आम्हाला म्हणजे आमच्या साहेबांना असले काही नाही करावे

लागत. म्हणजे अगदी वीस रूपयांत तयार होतात लोक! हा असा आहे साहेबांचा करिश्मा!

लवकरच येतील साहेब..
आपले विचारांचे मोती उधळतील..
तुम्ही आम्ही ते हिरीरीने वेचू. वेचून पुढे जाऊ. त्यांचे विचार आपल्या मनांना पुलकित करतील. फुलवतील. एक वेगळी अनुभूती देतील.

साहेबांनी आपल्याला काय काय नाही दिले?
आमचे म्हणाल तर.. ती लाल दिव्यांची गाडी मिळेल तर त्यांच्यामुळेच.
साहेब द्रष्टे आहेत.
त्यांचे कर्तृत्व महान. त्यांची मूर्ती ही तितकीच महान असली तरी.
साहेब हे साहेब आहेत.
आम्ही त्यांचे लेकरू आहोत.
गुरूचरणी शिष्य जातो तसे आम्ही त्यांना शरण आहोत. त्यांच्या पाऊल धुळीच्या एका कणाचीही सर आम्हास नाही. आम्ही त्यांचे पाईक हे या माईक वरून सांगावयास आम्हास अजिबात कमीपणा वाटत नाही.
त्यांच्या कर्तृत्वरूपी अवकाशात ही नगरी उजळून निघताना एक पणती म्हणून तेवत राहण्याचे भाग्य आम्हांस मिळावे ही एक इच्छा!
लवकरच साहेब मंत्रिमंडळाचा विस्तार करतील.
साहेबांचे लक्ष घारीप्रमाणे चौफेर. साहेबांना सारे दिसते.. सारे समजते..
सर्वज्ञानी .. अंतर्ज्ञानी असे साहेब आपल्याला लाभले हे आपले भाग्य.
असे हे साहेब आता पोहोचत आहेत.
कुठे काय विचारता?
तसा संदेश आलाय मला.
तेव्हा आमचे परमप्रिय आणि एकमेव नेते.. राष्ट्राचे भवितव्य.. राष्ट्र उद्धारक.. राष्ट्रत्राता.. आणि देश निर्माता.. देश संरक्षक.. माननीय श्री. महिपतराव गणपतराव सुगंधे पाटील अक्कलकोटकर साहेब यांच्या स्वागतास तयार रहा..

काय .. ठीक आहे ना?

साहेब ऐकतील ना  भाषण.. ?

ऐकतीलच हो.. इथे नसले तरी.. घारीसारखे लक्ष त्यांचे सगळीकडे.
चला..
जायची वेळ झाली.
चरणधूळ भाळी लावण्याची!

११

**वरदक्षिणा..**

आमचे खास काही म्हणणे नाही आहे हो..
काय आहे की जनरीत पाळावी लागते. ऐकताय ना?
जनरीतीपुढे कोणाचे काय चालतेय?

तसा विरोध माझा सगळ्याच वाईट गोष्टींना आहे हो.
कसे आहे ना काळानुरूप माणसाने बदलावे. बदल ही निरंतर घडणारी गोष्ट आहे. आणि बदल कसा .. कालसुसंगत हवा. पण संस्कृती आणि परंपरा अशा काही गोष्टी असतात की नाही? बदल असे तडकाफडकी होत नसतात. आणि करूही नयेत तसे. माणसाच्या कलाकलाने ते घडवणे इष्ट. कोणाचा कल कसा नि कोणाचा कसा! कशाला कुणाला बदलासाठी भरीस घालावे? संस्कृती जतन करणे .. परंपरा पाळणे.. आणि बदल घडणे वा घडवून आणणे.. सारे कसे एकमेकांत गुंफले पाहिजे एखाद्या हारातल्या फुलांसारखे! हो की नाही? पहिल्यापासूनच माझ्या भूमिका कशा स्पष्ट असतात!

आता माझा शंभू..
किती लाडाकोडात वाढलाय.. काय हौस नाही पुरवली त्याची आम्ही? फटफट्या उडवतो काय.. आता जीप घेऊन दिलीय..कशाची ददात म्हणून नाही. आणि देवदयेने काही कमी पण नाही. तुम्हाला सांगतो आमच्या घराण्याचा दीपक.. म्हणजे कुलदीपक आहे आमचा शंभू.. तशी आमची रंजू.. म्हणजे रंजना.. लहान आहे अजून. लग्नाची नाही. पण कसे ठरवले आम्ही पहा.. लग्न होईल तिचे ते हुंडा न घेणाऱ्याशीच! असल्या कुप्रथा मोडायलाच हव्यात. समाजात बदल हा घडायलाच हवा. हुंडा बिंडा घेऊन विकत नाही घेणार हो आम्ही आमच्या

जावयास.  खरेय की नाही हो सांगा.. हुंडा कलंक आहे आपल्या समाजावर. काळिमा.. तेवढी ही मोठी होऊ देत.. तोवर हा बदल झालाच असेल. नसेल तर घडवून आणू आम्ही. आमचे काय ठरवले की ठरवले. त्यात बदल नाही. फक्त अजून सात एक वर्षांचा काळ जाऊ द्यावा.

आम्हाला काय वाटते ना .. की अजून समाजाची तशी तयारी नाही. शंभू झालाय लग्नाचा.. तो काही त्या बदलापर्यंत थांबेल का? नाही हो. काही गोष्टी वेळच्या वेळी झालेल्याच बऱ्या असतात. तेव्हा शंभूचे लग्न थाटात होणारच.

आणि हुंड्याचे काय म्हणता?
अहो.. नाव नको..
आम्ही हुंड्याच्या विरूध्द..
सांगितलेना..
अहो मान्य आहे अजून ती प्रथा गेली नाही ..तरीही.

म्हणून सध्या रीतीप्रमाणे होऊन जाईल . उगाच कोणाला अडणार नाही नि नाडणार नाही.
आमचे घराणे पहा.. शंभूकडे पहा.. त्याचेच हो हे सारे.. कुणाचीही मुलगी येवो.. सुखात राहिल. सुखात राहिल.. ऐश्वर्यात राहिल. राहिल काय लोळेल..
तिच्यासाठी तशी वरदक्षिणा ..
ती मात्र घ्यावी लागेल..
हुंडा नाही हो..
आपल्या परंपरा आपण नाहीतर कोण सांभाळेल सांगा तर?
खरेय ना?

१२

**लक्ष्मीची पावले..**

किती गोड वाटते ना ऐकायला? कान सुखावतात.. जीव सुखावतो.. नुसते ऐकूनही!

मुलगा झालाय लग्नाचा..
नि आम्ही वाट पाहातोय त्या लक्ष्मीची! कधी एकदा त्या लक्ष्मीचे होईल आगमन..
किती खस्ता खाल्ला या दिवसासाठी!
धनाची पेटी दुसऱ्याघरी आणि अस्सल धनाचा पेटारा आपल्या घरी यावा..
काय काय नाही केले? देवीला नवस केला.. त्याच्या जन्मापूर्वी.. म्हणाले.. देवी माते.. शक्तिमान तू.. नको देऊस माझ्या पोटी अजून एक मुलगी..
तुझ्यामाझ्यासारखी.. तू साक्षात देवी.. तुझे ठीक आहे. पण माझ्यासारख्या बिन देवींचे काय करावे?
नकोच ते..
मुलगी म्हणजे चिंता..
मुलगा म्हणजे निश्चिंती..
मुलगा म्हणजे मोक्षाची गॅरंटी..
शेवटला दिस गोड व्हावा..
त्यासाठी तोच हवा .. वंशाचा दिवा.. त्याला पर्याय काय?

मुलगी म्हणजे धन .. पण परक्याचे.. त्यासाठी कसली करेन मी प्रार्थना? नि तिचे कसले केले असते मी स्वागत?
ढोल नि ताशे वाजतील तेव्हाच जेव्हा या माझ्या कुशीत असेल एक मूल.. म्हणजे मुलगा.

काल मी कुणाला म्हणाले ही.. माझा एकुलता एक हो लेक.. ती बाई म्हणते कशी.. काय हे काशीबाई.. रंजू आणि अंजू .. दोघांना विसरलात की काय? मी म्हणाले, नाही हो.. पण त्यांना काय आपले म्हणायचे का?

माझा मक्या कसा .. माझा म्हणजे आमचा आहे..
तसा हूड आहे अजून.. पण नादानी काय आयुष्यभर टिकते? मुलींचे काय.. कितीही आपली म्हणावी.. शेवटी परक्याचीच धन..

पण तुम्हाला सांगते.. मुलगी ही लक्ष्मी बरे.. लक्ष्मी म्हणजे ऐश्वर्य.. धन.. ती आली की घर सुखसमृद्धीने भरून जाईल.. हो की नाही?

माझा मक्या आहेच तसा हो. काय भाव चाललाय ठाऊक आहे ना मार्केटात? माझा मक्या इंजिनियर.. त्यात एकुलता.. म्हणजे हे सारे त्याचेच.. परत सरकारी नोकरी.. म्हणजे .. कुणाला बोलू नका .. वरकड पैशांची सोय.. मक्या म्हणजे खणखणीत बंदा रुपया.. मी तो तसा वाजवून घेणारच ना!

त्यामुळे लक्ष्मीचे स्वागत करण्याची तयारी करतेय मी. लक्ष्मी म्हणजे येणारी गृहलक्ष्मी. एवढ्या भरल्या घरात रिकाम्या हाती कशी येईल ती? म्हणजे माझी सून. म्हणतात ते खरेय .. धनाची पेटी बनून येईल ती..भरल्या घरात भरल्या हातांनी.. जुने लोक हुशार खरे.. उगाच नाही बेटी धन की पेटी म्हणायचे..

आता ती लवकरच येईल. समृद्धी आणि ऐश्वर्य घेऊन! दुसऱ्या घरून येताना हे सारे घेऊन येईल ती.

वाट पाहतेय तिच्या येण्याची..
लक्ष्मी आणि लक्ष्मीच्या पावलांची!

१३

## ऐकलंत काय ..?

काय म्हणता? तुम्हाला ठाऊक नाही? खरंच?
म्हणजे तुम्हाला काही नाही कळले? सगळयांना ठाऊक असेल असे वाटले मला. म्हणजे असल्या गोष्टी काय लपून थोडीच राहातात? मी सांगते तुम्हाला पण कोणाला सांगू नका.. आणि मी सांगितलेय म्हणून तर नक्कीच नका सांगू. तुम्ही माझ्या खास म्हणून सांगते.

पण मी तशी कोणाच्या अध्यात मध्यात नसते हो. म्हणजे तशी सवयच नाही हो मला. उगाच इकडची काडी तिकडे लाव.. चुगली कर.. कानातल्या कानात सांग.. असल्या गोष्टी नाही हो जमत. आपण बरे की आपले काम बरे. कशाला त्या चांभार चवकशा. नि नसत्या कुचाळक्या. ती सवय त्या गोदावरीबाईंची बरे.. गोदावरी म्हणजे..नाही ठाऊक? ती नाही का.. ते बसके नाक .. दात थोडे वाकडे. हो हो .. तीच .. म्हणजे त्याच त्या गोदावरीबाई.. त्यांना सवय आहे हो असली .. म्हणजे बघा, त्यांची मुलगी ती पळून गेलेली मागच्या वर्षी.. माहितीय ना .. तर आता नाक वर करून फिरतात त्या..मी असते तर मला तर बाई नसते फिरवले.. मी तर शरमेनेच अर्धमेली झाले असते. तर सांगत काय होते.. उगाच त्या गोदावरीबाईंचा विषय आला मध्ये.. तशी वाईट सवयच आहे त्यांची.. जाऊदे .. आपल्याला काय.. ज्याचे त्याचे ज्याने त्याने पहावे आणि काय? पण एक आहे अशांना देव दरबारात नाही मिळणार माफी कधी..
तर सांगत काय होते.. त्या गोदाबाईंच्या नादात विसरले पहा..
पण आठवले की सांगते. तुम्ही माझ्या खास आहात ना म्हणून. उगाच बाकीच्यांशी नाही मी बाई बोलत बसत. ती नटवी आहे ना.. सवित्रा.. बाई काय विचित्र नाव नै.. ती कोपऱ्यावरची .. तिला आहे तसली सवय.. कोणाला काय

बोलावे .. कसला नाही धरबंद तिला.. तरी बरे घरात नसतो पाय तिचा. नोकरी करते ना म्हणून तोरा तिचा! आम्ही पण केली असती नोकरी.. पण आमचे हे .. समर्थ आहेत हो घर सांभाळायला..पण मी काय म्हणते .. करा तुम्ही नोकरी.. हुंदडा गाव .. पण उगाच मिरवत कशाला फिरायचे.. मी कमावते , मी कमावते म्हणून. तर तिला आहे असली सवय.. अहो कामवाल्या बाईला ही सांगत असते काहीबाही.. मला कसे कळले? ती कपड्याला येते ना आमच्याकडे मंजूळा.. तीच हो तिचा नवरा दारूडा आहे.. ती सांगत होती. मी हो ला हो करते नुसती.. उगाच कशाला नसत्या फंदात पडा.. एका कानाने ऐकून दुसऱ्याने द्या सोडून. काही म्हणा ही सवय वाईटच हो.. उगाच इकडची काडी तिकडे लावायची. मला तर बाई कामातून फुरसत नसते. यांना इतका फावला वेळ कुठून मिळतो कुणास ठाऊक.. म्हणजे ती मंदी आहे ना ती सांगत होती.. त्या भडकमकरांकडे कामाला आहे ती .. भडकमकर म्हणजे पांढरे केस .. बरोबर..तर त्या मंदीच्या नवऱ्याला रिक्षा मिळाली म्हणे.. हो .. चालवतो तो .. दारू पिऊन कुठे ठोकली नाही म्हणजे मिळवली.. मला कसे माहिती तो दारू पितो? अहो हे लोक असलेच..

दारूशिवाय काम होते होय यांचे? म्हणजे आमचे हे पण घेतात अधूनमधून दररोज.. पण ती उंची.. सस्त्यातली नाही आणि रस्त्यात थोडीच सापडतात त्या साटमबाईंच्या नवऱ्यासारखे. तर मंदी सांगत होती की ..जाऊदे आपल्याला काय करायचेय.. बाई गं. किती वेळ झाला नाही? अजून किती कामे बाकी आहेत. आपले काय त्या कामतबाईंसारखे थोडीच आहे? काय ना ..जे सांगायला आले तेच विसरले हो..

आठवले की सांगते.. चला निघू? दळण आणायचेय.. पाणी भरायचेय.. माझे त्या रंगी सारखे थोडीच आहे.. तिचा तो लंगडा नवरा तिला कितीतरी मदत करतो.. बायल्या मेला.. चला आता खरंच निघायला हवे.. ते काय सांगायला आले होते.. विसरलेच. आठवले की नक्की सांगते. आहात ना घरी.. निघते

१४

## नाही, मी येणार नाही!

मी मुळीच ऐकणार नाहीये तुमचे..
सांगून ठेवतो.
का म्हणजे काय?
मी कुठे.. तुमचा तो घोडा कुठे..
घोडा म्हणजे तो घोडेगावकर.. तोच त्याला पहिले बक्षिस कायतरी मिळाले ना हल्लीच अॅक्टिंगचे तो. तर या घोड्याला बोलावणार असाल तर मी मुळीच नाही येणार.. सांगून ठेवतो. अरे हा लंगोटात होता किंवा बिनचड्डीचा फिरायचा तेव्हापासून आम्ही रंगभूमी गाजवतोय. त्यात हा तसा बराय पोरगा.. पण आम्ही कसे methodical करायचो अभिनय.. आता सगळेच बासनात गुंडाळायला निघालीत ही आजची पोरं.
आम्ही काय गाजवली नाटके आमच्या काळात महाराजा! आता वय झाले. नाही उभे राहवत. नाहीतर दाखवला असता खरा अभिनय तोंडाला रंग लावून. हे लोक काय ती उत्स्फूर्त अॅक्टिंग करतात म्हणे! मी म्हणतो यांची ती अॅक्टिंग.. आमचा तो अभिनय!  स्टेज गाजवायचो आम्ही. गाणी काय रंगायची आमची! गेले ते दिवस म्हणा.. आता काय ट ला ट नि फ ला फ असली गाणी.. आणि त्यात ढाण ढाण संगीत.. कानठळ्या बसवणारे.. खरे दिवस आमचे होते महाराजा! आणि ही आजची पोरे रंगभूमीची सेवा करण्याच्या बाता करताहेत..

अरे करता आहात कारण मुळात ती आम्ही घडवली म्हणून ना! आमच्या आधी होऊन गेले त्यांनी सुरू केले नि आमच्यामुळे पुढे गेली रंगभूमी!
आणि हा आजचा घोडा खिंकाळतोय? आणि वर तुम्ही म्हणता त्याच्याबरोबर आम्ही बसावे स्टेजवर? मिळाला असेल हो राष्ट्रीय पुरस्कार.. पण आम्हाला काय कौतुक? आम्हाला ती रसिकांची दाद पुष्कळ आहे. इतक्या वर्षांनंतर ही ती

आठवते आम्हाला. आणि ऐकलेच असेल ना ..बक्षिसांसाठी काय काय चालते हल्ली.. आम्हाला जमले असते तर आम्हीही नसतो किती पुढे निघून गेलो? पण नाही.. आम्ही पडलो तत्वाची माणसे ना! असले काही कसे जमणार नि कसे पटणार आम्हाला?

ते काही असो.

तुम्ही बोलावताय प्रेमाने.. मी येईनही. पण माझ्याबरोबर त्या घोड्याचा सत्कार? सब घोडे बारा टक्के? अजूनही पेलू शकतो एका श्वासात वीस वीस ओळींचे संवाद. अजूनही घेईन टाळ्या.. हे वय साथ देत नाहीना म्हणून! आणि ही कालची पोरे..

पण नकोच.. मी निक्षून सांगतोय तुम्हांला.. नाही नाही नाही.. त्रिवार नाही! जर घोडेगावकरास बसवाल आमच्या पंक्तीत.. त्रिवार म्हणजे त्रिवार नाही. येत नाही म्हणून सांगा! या नटश्रेष्ठ बाबूरावने गाजवलेले दिवस अजून आहेत डोळयांसमोर! वन्स मोअर नि टाळयांचा गजर याशिवाय एक प्रयोग गेला नाही त्या नटश्रेष्ठास या कालच्या पोराच्या पंक्तीत बसवता? खुशाल बसवा.. दिवस तुमचे आहेत! संमेलन तुमचे आहे.. पण मी आलो तर बसवाल ना? निक्षून सांगतोय पुन्हा एकदा.. नाही म्हणजे नाही!

काय म्हणता..

प्रार्थना आहे तुमची?

ऐकतोय मी.. पण तरीही नाही. नाही हो जमायचे. नकोच.

कशाला? तुम्ही लोक आहात ना समर्थ.. रंगभूमीची सेवाबिवा करायला.

आम्हाला कोण विचारतोय आता..

काय म्हणता?

तो घोडा विचारतोय?

म्हणजे?

त्यानेच बोलावणे धाडलेय..

आम्हाला आदर्श मानतो तो? खरेच की काय म्हणता? मी म्हटले ना.. तसा चांगला आहे हो तो.. म्हणजे डोक्यात हवाबिवा नाही त्याच्या.

काय म्हणता?

थैली आणि सत्कार?

तसे तुम्ही लोक खूप चांगले काम करताय बरे.. आम्ही रूजवलेले रोप वाढवताय.. छान. चालू द्या बरे.. तुमच्याकडूनच आशा  हो सगळ्या.. आणि येण्याचे म्हणाल.. तर आग्रह मोडवत नाही हो.. येतो बापडा. कुणाचे मन मोडवत नाही हो माझ्याने. म्हणजे जुन्या जमान्यातला नटश्रेष्ठ खरा .. पण असो.. येईन.. तेवढी गाडी मात्र पाठवा हो.. दगदग सोसवत नाही.. काय..

१५

## आमची भूक परिषद!

हा.. आलो आलो..
कुठून काय.. कुठूनही असो.
पण सांगतो.
जागतिक भूक परिषद..
तिचे खास अधिवेशन होते ना तिथून येतोय डायरेक्ट!

परिषद कशी झाली म्हणता?
छान!
शेतकरी नि कष्टकरी..
भूक नि भूकबळी..
शहरी नि ग्रामीण कुपोषण..
समस्या नि उपाय..
सर्वांगी विचार सर्वांनी केला!
कुठून कुठून आलेले लोक! दूरदूर गावचे .. म्हणजे शहरीच.. त्या गावच्या अशिक्षितांना कसला येणार अंदाज या समस्येचा! तिथे आपल्यासारखेच हवेत.
वेळ का लागला विचारताय?
अहो, समस्याच  किती गंभीर..
विचार विनिमय करायला वेळ लागतोच ना. सांगोपांग अगदी. आधी समस्येचा उहापोह.. मग तिचा सर्व बाजूंनी वेध.. त्यावर उतारा.. म्हणजे उत्तर हो.. तेही आम्हीच ना शोधणार! जबाबदारी आमची ती!
गावोगावी किती भुके  नि कंगाल आहेत त्यांची पाहणी .. त्याचा शास्त्रशुद्ध अभ्यास.. शेतकरी समस्येचा धांडोळा.. धांडोळा.. डोळा नव्हे.. अगदी बौद्धिक मेजवानी हो.
परिषद अगदी यशस्वी..

यशस्वी म्हणजे काय विचारताय?

समस्या सुटली?

अशी तशी आहे होय ती सुटायला? नाही,  तसे काय काय उपाय सुचवले कोणीकोणी.. ते सारे आम्ही पुढच्या परिषदेत करू कव्हर.
तूर्तास सरकारी पातळीवर निर्णय झालाय..

कसला काय?

या समस्येचा अजून मुळापासून अभ्यास करण्याचा. हो .. त्यासाठी समिती असेल एक.
तेच सांगतोय..
परिषद एकदम यशस्वी..
यशस्वी म्हणजे .. परत परत तेच .. अहो असे समस्येवर उपाय एका दिवसात निघतात होय? यशस्वी म्हणजे.. माझी नियुक्ती झालीय एका समितीवर.. टीए.. डीए.. आणि भोजनभत्ता!

काय म्हणता?

भूकबळीच्या समस्येवर समितीत भोजनभत्ता? थोडे विचित्र असेल पण सांगू सरकारी समितीचे कायदेकानू पाळावे लागतात हो.  आणि सरकारी नियम पालन न करणे म्हणजे.. कायदेभंग! तो करू म्हणता? नको.. त्यापेक्षा तो भोजनभत्ता घेऊन टाकणे बरे!
पण मला आवडली परिषद..
थोडी दमछाक झाली.. कारण दिवसभर त्या वातानुकूलित दालनात.. या फाईव्हस्टारचे एसी फार पॉवरफुल्ल बाबा! त्यातून बाहेर आलो तर हा उकाडा! दमणार नाहीतर काय!
खरे सांगतो पण त्या नागपूरच्या कुणी पेपर वाचला त्यात उन्हातान्हात शेतकरी कसा घामाघूम होऊन आजारांची शिकार होतो याचे हृदयद्रावक वर्णन होते .. मला तर त्या एसीत घाम फुटल्यासारखे झाले. कसे काय बुवा राबतात कोण जाणे! खरेच ..

काय म्हणालात.. जेवण?

ते झाले हो..
ताजचे जेवण म्हणजे प्रश्नच नाही नाही का?

थोडक्यात काय जागतिक भूक परिषद चांगलीच यशस्वी झाली हे खरे..
आता आम्हाला लागलेत पुढच्या अधिवेशनाचे वेध!
जागतिक आहे तेव्हा कदाचित परदेशी ही असू शकते..
आणि समितीचा मेंबर मी..
परदेशात जायचा चान्स म्हणता .. नाही म्हणजे हो.. म्हणजे नाही.. तसे नाही काही.. पण समस्या गहनच आहे हो.. आमच्यासारख्यांनीच प्रयत्न करायला हवेत.. खरे की नाही?

१६

**द्या टाळी !**

टाळी द्या टाळी !
आहात कुठे ..
अहो आपले जमले बरं..
काय जमलं काय विचारता?
आपले विचार जमतात बरे का?
अगदी शंभर टक्के जमतात!

तुम्हांला वाटते ना की आम्ही प्रगत होतो.. मला ही तेच वाटते..
वाटतच नाही नुसते तर पटते देखील!

त्यात काय नवल हो?
हे विज्ञान नि आधुनिक तंत्रज्ञान हे आजचे थोतांड हो नुसते! सारे काही आहे आपल्या वेद आणि पुराणात.
विमाने कसली उडवतात ते अमेरिकन.. आपल्या इथे त्या आधीच उडवून झालेली. हे पांढरे कातडीवाले महा डांबीस हो. आपले शोध चोरले. तुम्हाला पण तेच ना वाटते?
द्या टाळी!
तर तेच तर सांगतोय..
कुठलाही नवा शोध घ्या तो तुम्हांला सापडायलाच पाहिजे त्या पुराणांमध्ये.
हो अगदी कॉम्प्युटर ते आजचे ते मोबाईल.. साधे फोन ते टीव्ही देखील!
तुम्हाला काय वाटते ते महाभारत असेच लिहिले गेले असेल? कॅमेरात लाइव्ह पाहून असणार. आता पुरावा प्रत्यक्ष नाही हे खरे .. काय आहे आपण कोणी तेव्हा नव्हतो .. पण म्हणून हे असे नाही असे म्हणू शकतो आपण? परिस्थितीजन्य

पुरावा आहे हो. इतके अचूक नि तंतोतंत युद्धाचे वर्णन.. रामायण नि महाभारतातले.. असणार ते तंत्रज्ञान. नुसते तेच नाही..अगदी साधेच  वैद्यकीय उदाहरण घ्या..  जुन्या जमान्यात आजची सारी ऑपरेशनं व्हायची.. नुसतीच ती नाही.. त्याहूनही प्रगत. खोटे नाही.. पुरावे आहेत. नाहीतर हत्तीचे शिर आरोपण झाले असते का शक्य? आजच्या विज्ञानाची गेलीय इथवर मजल अजूनपर्यंत? नाही ना..?

मला ठाऊक आहे तुमचं आमचं जमतं इथे..तुमचे आमचे विचार जुळतात अगदी!  म्हणूनच तर म्हटले द्या टाळी!

पण अजूनही इथे आहेत शंकासुर..
त्यांना ही पुराणातील वानगी पुराणातच म्हणून बेदखल करावीशी वाटतात.
करोत बापडे..!
झाकून ठेवल्याने काय सूर्य उगवायचा थांबतो होय.
जे आहे ते आहे.. facts are facts.. आणि काय!

मला त्यांची ना कीव येते हो.. किती हा आंधळेपणा? आपल्या भूतकाळाचा काही अभिमान? किती विकले जाणार  तुम्ही त्या पाश्चिमात्यांस?

काय म्हणता?

मागच्या वर्षी माझे बायपास झाले ते..
छे! छे! बायपास काय ते हॉस्पिटलवाल्यांनी मागे लागून करवले..पैशांसाठी हो.. त्यात आमचे घरवाले.. एकजात कुचकामी.. आणि मी तसा शुद्धीत नव्हतो .. त्यात परत आयसीयुत! कोणी बोलू देईल तर शपथ! हो .. नाहीतर त्या पाश्चात्य इलाजाचा नसता घेतला आसरा.. आपल्याकडे साऱ्या रोगांवर अक्सीर आहे इलाज. उगाच हॉस्पिटलांची कशाला भरा बिले.. माझा म्हणून सांगतो अनुभव.. ते बायपास झालेले मला अजिबात पटलेले नव्हते आणि पटणार नाही तुम्हाला

सांगतो..  घरच्यांच्या आग्रहाखातर खातो त्या गोळया पण खरा गुण त्या सकाळच्या मधपाण्याचा.. अहो जुनी पुस्तके वाचून शोधून काढला मी हा रामबाण इलाज! कशाला हवीत ती महागडी औषधे? सांगायचे तात्पर्य .. सारे काही आहे त्या जुन्या पुराणात नि पुस्तकांत.. फक्त वाचायची इच्छा पाहिजे.. आणि त्याहूनही खरा अभिमान पाहिजे!

मला म्हणून तुम्ही आवडता.
तुमचे नि माझे जमते यामुळे..
खरे सांगतो तुमचे आमचे जमले..
द्या टाळी!

१७

## मी म्हणजे मी आहे!

नमस्कार!

आलात?

तसे तुम्ही येणार हे ठाऊकच होते मला.

न येऊन चालले असते?

नि तसे ही नाही.

माझ्यासारख्या साठी तुम्ही येणार नाहीत असे कसे होऊ शकते?

मी शेवटी म्हणजे मी आहे!

खरंय की नाही?

माझे कर्तृत्वच मुळी तसे आहे.
मी आलो इथे त्याआधी सारा अंधार होता. सगळीकडे कसा अनागोंदी कारभार!
कोणाचा पायपोस कोणात नाही.
पाहिलेच असेल तुम्ही कशी वाट लावलेली त्या माझ्या आधीच्या लोकांनी!
एकतर त्यांना काही येत नाही.
त्याहूनही त्यांची नीयत नाही!
वर नुसते पैशांचे खेळ!
माझे नाही बरे तसे!
त्यामुळे मी शेवटी मी आहे हे तुम्हालाही मान्य व्हावे.

नाही म्हणता?

ठीक.. थोडे दिवस जाऊ देत ..
हाती आली ना सत्ता की पाहून घेईन.
सत्ता म्हणजे पॉवर.. ताकद! त्यासगळयांना सत्तेचे डोहाळे काय.. सत्तालोलुप कुठले!
माझे तसे नाही..

तुम्हालाही ठाऊक आहे.
मी शेवटी मी आहे!
माझा रेकॉर्डच तसा आहे म्हणा ना! म्हणजे बघू नका लगेच...
उगाच कालहरण कशाला?
मी सांगतोय ना म्हणजे खूप झाले. कारण..
अहो. मी म्हणजे मी आहे..
मी म्हणेन ते चुकीचे कसे असेल?
उगाच बुवा जास्त चिकित्सकपणा करता तुम्ही!
त्या आधीच्यांच्या वेळी कुठे गेलेली तुमची ती वृत्ती? की निवडक वेळी वापरता?
तुम्ही त्यांचे बगलबच्चे वाटताय मला. नाहीतर असे शंकासुरासारखे नसता वागलात!
आणि काय हे ..
आपले भलेबुरे पण कळत नाही? अति बुद्धु दिसता..
काय म्हणालात?
तुमचा पूर्ण विश्वास आहे माझ्यावर.. वाटलेच मला..
तसे तुम्ही अत्यंत हुशार आहात.. चांगल्या वाईटाची तुम्हाला पारख आहे. तुम्ही अतिशय कुशाग्र बुद्धीचे आहात.
आणि शेवटी काय आहे ना..
मी म्हणजे मी आहे..
माझ्या हुशारीचा प्रभाव पडलाच पाहिजे ना तुमच्यावर!
पडणार.. पडणारच!
पडल्यावाचून राहणार नाही!
तर काय मग? खात्री पटली ना?
पटलीच पाहिजे हो!
न पटल्यास.. हा प्रश्नच मुळी गैरलागू आहे हो!
कारण शेवटी सर्वांना आपापला जीव प्यारा असतो ना! तुम्हाला ही असणारच!
शंकाच नको!
कारण तुम्हाला ही ठाऊक आहे..

शेवटी मी म्हणजे मी आहे!

१८

**लय मागणे नाही!**

कोण आहे रे तिकडे..
कोण नसणारच !
आता गेला तो जमाना रे..
काय ऐश होती सांगू राजा!
गाड्या काय.. नोकर कार.. चाकर काय..!
किती समृद्धी.. लक्ष्मी पाणी भरी..
तशी अजून भरते म्हणा..
पण प्रत्यक्ष खुर्चीची उब.. !
तिची तुलना कशाशी करावी?

तिच्यासमोर कोण नतमस्तक होत नाही? साध्यात साध्या फाटक्या माणसापासून.. देशविदेशातील मारे उच्च शिक्षणाच्या बाता मारणारे .. विद्वान.. पुस्तकी कीडे..
आणि या साऱ्यांना तिच्या समोर नतमस्तक होताना पाहायची सवय झाली..
त्याहून मोठा आनंद तो कोणता? लक्ष्मी काय.. येत राहील.. खुर्ची असताना कोटी.. नसताना लाखात.. एवढाच फरक! पण त्या साध्या आम पासून ऐट मिरवणाऱ्या खास पर्यंत साऱ्यांना झुकताना पाहण्याची मौज .. ती नाही एकट्या लक्ष्मीत!
काय रूबाब नि ऐट होती महाराजा!
एका लेखणीच्या फटकाऱ्याने होत्याचे नव्हते नि नव्हत्याचे होते करण्याची ताकद होती.. त्या शिक्षणाची ऐब दाखवणाऱ्यांच्या लेखणीत काय असेल..
असली ताकद होती.. ती ताकद शोधतोय आम्ही!

तर देवा.. काय रे हे दिवस दाखवतोयस रे? काल थुंकी झेलण्यासाठी धावणारे आज लुप्त झाले? कुठे?
कुठे काय..
अजून कुठे..
जिथे शिते .. तिथेच तर भुते!

देवा! छळ नको तुझ्या भक्ताचा रे..विसरलास..
आम्ही तो जीर्णोद्धार केलेला त्या मंदिराचा..
तुझ्या नावाने घातलेली ती जेवणे..
एवढे कमी की काय तर यावर कळस म्हणजे ...
तो गावदेवीच्या मंदिरावरचा सोन्याचा कळस..
आठवतोय ना ..
की विसरलास इतक्यात?
अजून कसली रे आठवण करून द्यावी? आम्ही लोक बघ .. घेतले ना काही की त्या बदल्यात काम झालेच पाहिजे!
अरे तत्वं बित्व काही आहेत की नाहीत?

व्याकूळतेने  सांगतोय रे ..

तेवढी ती एक खुर्ची.. ती मिळवून दे .. आम्ही प्रयत्न करतोच .. तुझा आशीर्वाद असू दे ..
फार मागणे नाही..
लक्ष्मी तिच्या पावलांनी येतच राहिल..
तू त्या खुर्चीची व्यवस्था बघ रे जरा..

ऐकतोस ना रे देवराया?

१९

**भो.. भो .. भो ..**

काय वैताग आहे सांगू..
कालपरवा पर्यंत किती ऐश होती..
समोर अगदी छान छान जेवण यायचे. झालेच तर एखादे हाडूक मिळायचे चघळायला.
अजूनही आठवते ..
ती हाडकांची रास. त्यादिवशी साहेबांनी घेतलेला ऑफिसचा चार्ज. मला वाटते कुठले तरी मोठे झालेत साहेब. खुर्चीवर बसून झुलत होते. समोर सारे माना डोलवत उभे.. काही तरी यस सर , यस सर म्हणत उभे होते. साहेब जरा जास्तच खूश वाटत होते. कोणी तरी म्हणाले त्यांना.. मंत्रीसाहेब.. म्हणजे काहीतरी मंत्रीबिंत्री असे असणार साहेब. मला एकूण अवतारावरून वाटले की हे मंत्री वगैरे कोणी मोठे असणार!
उगाच नाही लाड झाले माझे.
कोणीतरी म्हणायचे ते ऐकलेले आठवते .. म्हणायचे.. मोत्या आता मजाच मजा तुझी .. समर्थाघरचे श्वान! कुणी म्हणून गेले म्हणे.. समर्थाघरचे श्वान .. त्याला सर्व ही देती मान! खरे असणार ते.
साहेब तिथे होते तोवर सगळे लाड करायचे. साहेबांचे माझ्यावर प्रेम अतोनात. कुणालाही त्यांना भेटायला येण्याआधी मला सलाम करायला लावायचे साहेब. माझाही तितकाच मान होता! जेवणाची ऐश होती. जगण्यात मौज होती. साहेबांच्या कुशीत बसून लोक मला नाही तर साहेबांना घाबरताना पाहून ही गंमत वाटायची.
लोक काय काय काम घेऊन यायचे. कोणी नमस्कार करायचे तर कोणी सलाम. कोणी तर डायरेक्ट पाया पडायचे! मग साहेब सर्वांचे ऐकून घ्यायचे. कुणाकुणाकडून काहीवेळेस कसली तरी बंडले घेऊन नीट काळजीपूर्वक ठेवून द्यायचे! आणि ज्यादिवशी ही बंडले यायची त्यादिवशी मला दुप्पट खाऊ घालायचे! कित्येकदा तर असे दिवसचे दिवस मी खुशीत भरपूर खाऊन घालवले

होते. साहेब मात्र मला घेऊनच  बसायचे. ते खुशीत सदाच  असायचे. इतक्या वर्षांत कळायचे मला..केव्हा आनंदात असतात नि केव्हा नाही! तर हे असे होते दिवस.

मग काय चावी फिरली कोणास ठाऊक.. साहेबांच्या ऑफिसाची बदली झाली. काहीतरी लोक बोलले..
साहेब आता मंत्री नाहीत का असे काय तरी. लोकांची वर्दळ घटली. आधी सकाळपासून लोकांची रीघ लागायची. लोक बाडबिस्तरा घेऊन यायचे.. ते येणे बंद झाले. आता साहेब मला घेऊन बसतात ते सवयीने..
हल्ली साहेब जरा खिन्न वाटतात.
लाड करतात माझे पण ती पण नुसतीच सवय.
लोकांशी बोलताना आवाजातली जरब कमी झालीय साहेबांची.
की हा मला होणारा नुसताच भास? कोणास ठाऊक!
काही असो हल्ली ते दिवस राहिले नाहीत.
मला लोकांचा हल्ली सलाम मिळेनासा झालाय.
जेवण मिळतेय पण त्यात पूर्वीची ती शान नाही.
हाडके मिळतात पण ती चघळण्यातली मजाच गेलीय.
साहेब उदास असले की मला ही उदास वाटल्यावाचून राहवत नाही.
कंटाळलोय मी आता.
वैताग आहे नुसता..
कोणालातरी बोलताना मी ऐकले त्या दिवशी..
साहेब .. पुडच्या टायमाला तुमी आल्यबिगर राहात नाय.. लिव्हून घ्या ..
त्याच्या तोंडात देव एखादे छानसे हाडूक पाडो! लवकरच तो दिवस येवो.
साहेब खूश तर आपण खूश..
काय ..
आपण आनंदानी शेपटी हलवावी ..
मस्त हाडके चघळावी ..
आणि ताणून द्यावी साहेबांच्या थंडगार खोलीत ..
आणि काय ..

भो.. भो..

२०

## मी पिंजऱ्यातला राघू ..

पाहतोय मी सर्व इथून बरे.
या पिंजऱ्यात बसलो असलो दिवसभर तरीसुध्दा काय झाले..
माझे ध्यान असते नीट.
काल पेरू खाताना मला दिसले नीट.. आमचे मालक ..
म्हणजे हा छोटा दिन्या ..
मस्तपैकी अभ्यासाला बसलेला.

म्हटले आज अचानक दिन्या आणि अभ्यास? माझे लाड करतो तो खूप पण उनाडपणा भरलाय अंगात. परवा रात्री दिन्याची आई त्याला ओरडत होती. म्हणून असणार अभ्यासास बसलेला. त्याच्या पुस्तकात ते काय .. कॉमिक्स दिसतेय.. म्हटले ना फार मस्तीखोर आहे हा दिन्या. तसा मनाचा चांगला आहे. पिंजरा कसा माझा लख्ख ठेवतो. मस्त पैकी पेरू.. माहितीय मला शेजारच्या जोशांच्या झाडावर चढून लपूनछपून आणतो.. पण माझ्यासाठीच  ना. मग कधी हिरव्या मिरच्या काय.. कधी मस्त डाळया काय. एकदा तर त्या तिखट मिरच्या खाताना माझी लाल चोच अजूनच लाल झालेली आठवते. एकूण कसे सगळे मस्त आहे.

तसा पिंजऱ्यात वेळ गेला नसता पण दिन्याची बहीण.. माया .. दिवसभर असते समोर.. माझ्या नाही.. आरशाच्या. काय दिवसभर पाहते कोणास ठाऊक. मला इथून दिसते सारे! कधीकधी बाकी सारे गेले की तिचा कोणी मित्र पण हळूच घरात शिरतो.. मित्र म्हणजे त्या कोपऱ्यावरच्या परबांचा शिरू. दोघे गप्पा मारत बसलेले पाहताना दिवस कसा छान जातो. पण तरी पिंजऱ्यात थोडा एकटेपणा जास्तच जाणवतो अशा दिवशी. पण एकदा दिन्या आला नि लाड केले माझे की सारे विसरतो मी.

तशी घरची शिस्त बरी आहे.
साहेब .. म्हणजे दिन्याचे बाबा ..

लोळत पडतात नि एकाएकी ऑफिसला जायला निघतात. माझ्याकडे ढुंकूनही न पाहण्याचे व्रत घेतलेय बहुधा त्यांनी. मी इथे येऊ नये अशी इच्छा होती त्यांची असे आले माझ्या कानावर पण मी आलोच .. त्याला कारण दिन्या आणि दिन्याची आई.

त्याची आई तशी चांगली आहे.

दिन्याला माझ्यासाठी काय काय देताना पाहिलेय मी. तिला पाहिले ना की वाटते माझी पण अशीच आई असणार ना? किती लाड ते पोराचे. मी लहान असताना माझे पण झाले असतील का असे लाड?  कोणास ठाऊक..

आम्हा पक्ष्यांचे सारेच वेगळे असते.

ही माणसे कशी रोज झोपतात उठतात काय .. कपडे काय घालतात.. रोज कुठे कुठे जात येत काय असतात. बोल बोल बोलतात.. तसा मीही बोलतो पण ते कसे थोडेफार.. हे लोक खूपच बोलतात.. कधीकधी भांडतातही.. पण गंमत म्हणजे.. एवढे मोठे ते दिन्याचे बाबा.. आम्हा पक्ष्यांच्या पिलाला ही उडता येते नि त्यांना अजून येत नाही. हे लोक जेवणात काय काय विचित्र खात बसतात. अजून गंमत सांगायची म्हणजे डायरेक्ट तोंडाने खाताही येत नाही त्यांना माझ्यासारखे! कधी शिकतील कोणास ठाऊक! हा पक्षाचा जन्म मोठ्या मुश्किलीने मिळत असावा बहुधा!

काही म्हणा घर छान आहे.

लहान आहे मी तोवर ठीक पण मोठा झाल्यावर मी कोठे जाईन?

पण मी लहान की मोठा?

आम्हां पोपटांत कुठे मोठे होऊन कामाला जाण्याची पद्धत आहे?

माझे काही भाऊ उडताना दिसतात झाडाझाडावर. हिरवेगार थवेच्या थवे उडताना किती मस्त दिसतात!

पण माझेही मस्तच चालले आहे.

छान पिंजऱ्याचे घर आहे.

मोठे होईतोवर सोय आहे..

पण..

एकदा हे जग मस्त पैकी बघून येईन म्हणतो. कुणास ठाऊक इतक्या दिवसांनी उडता येईल ना मला उंच? येईल नक्कीच! दिन्याला सांगून एकदा तरी उडून येईन .. कालच तो कायतरी गाणे गात होता.. शुक पंजरी हा .. काय असेल त्याचा अर्थ? त्याची आई म्हणाली, शुक म्हणजे रे हा .. पिंजऱ्यातला पोपट! दिन्या टाळया पिटत आला .. म्हणाला.. शुक शुक राघू! राघू हे माझे नाव बरे .. माहित नसेल म्हणून सांगतो.

थोडक्यात काय तर हे असे आहे!

मजेत आहे म्हणा!

खायलाप्यायला आहे..

मर्यादित किंवा अति मर्यादेत उडण्याची सूट आहे..

पिंजऱ्याची सुरक्षितता आहे..

अजून काय पाहिजे?

बस एकदा आकाश कसे नि झाडावर बसून पेरू खाल्ला तर कसा लागेल एवढेच बघून झाले की अजून काय पाहिजे!

दिन्याला सांगायला हवे..

सांगेन वेळ आला की!

आणि पुरेशी हिंमत ही आली की..

खोटे कशाला बोला!

२१

**भाऊ आणि बहीण ..**

सांगा तर पाहू पटकन ..
माणसाचे व्यवच्छेदक लक्षण कोणते.. नाही येत तुम्हाला..
अरेरे..
माणूस आहात की कोण! आपल्या मानव जातीबद्दल इतकी ही नसावी माहिती?
पण तुमचे हे घोर अज्ञान दूर केलेच पाहिजे.
थोड्याशा हिंट देतो..
पहा तरी जमते का?
तुम्ही कधी ऐकले आहेत का ..
वाघांना आपल्या जातीचा अभिमान.. आंब्याचे झाड बाकी झाडांकडे तुच्छतेने पाहते.. किंवा
पाण्यातील अखिल अरबीसागर शार्क ज्ञाति संघटना..
काहीच नाहीतर मलेरिया मच्छरांचा डेंग्यू च्या मच्छरांबरोबर संघर्ष .. तीन ठार.. चार जखमी वगैरे..
डोके नका हो खाजवू ..
कसे ऐकाल?
असे काही त्या अप्रगत आणि मागास जीवचरांना करता येईल का?
तेवढी त्यांची बौद्धिक प्रगती झालीय का? अर्थातच नाही..
आता तरी कळतेय का काय म्हणतोय मी?
नाही..
अगदीच मागास बुवा तुम्हीपण.
ह्याला म्हणतात अभिमान आणि अस्मिता!
आता तरी कळले की नाही उजेड पडला त्या बथ्थड डोक्यात?
आता मला कळाले हो..

मी त्या ह्या जातीतला .. तुम्ही त्या खालच्या .. कसे कळणार तुम्हाला? तेव्हढी प्रगती व्हावी लागते एवढे कळायला देखील!
पण काही हरकत नाही..
मी समजवून सांगतो..
अखिल मानव जातीचा हा युएसपी आहे हो ..
अभिमान आणि अस्मिता!
कुण्या प्राण्यांत नाही..
वृक्षवल्लींत नाही..
कुठल्याही इतर सजीवात नाही..
असा अभिमान आम्हाला प्रत्येक गोष्टीचा असतो!
याचे कारण सरळ आहे ..
तो आम्ही उत्क्रांतीच्या एका टप्प्यात कमावला आहे !
जात आणि पोटजात..
धर्म आणि पंथ ..
यांचा अभिमान तर सर्वात कडवा!
आणि आम्ही यावर नाही थांबत!
आमचा अभिमान म्हणजे इतरांस तुच्छ लेखल्यावाचून तो पुरेसा व्यक्त नाही हो होऊ शकत!
आमचा अभिमान कशाकशाचा?
स्वधर्माचा.. स्वपंथाचा..
स्वजातीचा.. स्वपोटजातीचा ..
स्वभाषेचा .. स्वबोलीचा ..
स्व राज्याचा .. स्वतालुक्याचा
स्वशहराचा.. स्वगावाचा..
स्वरस्त्याचा.. स्वगल्लीचा..
स्वसोसायटीचा.. स्वइमारतीचा ..
स्वमजल्याचा.. स्वघराचा..

असे अभिमान आम्हाला वाटत असतात. आणि कोणी आमच्या शेपटावर दिला पाय की आमच्या या अभिमानदादाची बहीण.. अस्मितातार्इ .. ती दुखावते आणि आपला फणा काढते बाहेर. या भावाबहिणींचे एकमेकांवर फार प्रेम हो..
आहे तुमच्या माहितीत इतकी प्रगत दुसरी कुठली जात..
अभिमान आहे मला आपल्या मानव प्राणी असण्याचा!

तुम्हालाही आहे ना?

का तुम्ही अजून तितके नाही झालात .. उत्क्रांत?

आमच्या जातीतले झाले बरे .. गेले पुढे .. नाहीतर तुम्ही..
मागास कुठले..!

२२

**जय जय रामकृष्ण हरी ..**

जय जय रामकृष्ण हरी..
जय जय रामकृष्ण हरी..
पडा रे लोकांनो .. पाया पडा.

कोणाच्या काय?

अजून कोणी आहे का इथे?

कोणी नाहीना माझ्याशिवाय?

मग अर्थ सरळ आहे.
पडा पाया माझ्या..

का म्हणता?

कारण ते ही साधे सरळ आहे..

तुम्हाला नाही माहिती?

किती अज्ञान.. लक्ष कुठे असते तुमचे?

कालचीच गोष्ट..

सर्वांना माहिती झालीय ती.. तुम्हाला नाही म्हणता?

मग मीच स्वत: सांगून टाकतो..
तसे मला नाही आवडत हो स्वत:च स्वत:चे गुणगान करायला. उगाच शेखी मिरवणे.. हा स्वभावच नाही हो माझा. पण आता सांगावे लागेल.
आणि विनम्रतेनेच सांगतोय..
मीच तो ज्याला काल परमेश्वर भेटला.. हो प्रत्यक्ष ईश्वर.. परमात्मा..

काय म्हणता.. विश्वास नाही तुमचा?

कशावर? प्रत्यक्ष ईश्वरावर? की मला तो भेटला यावर?

काय आहे काही थोड्यांनाच दिसतो तो. म्हणून तर तो नाहीच असले काही ते पाखंडी बोलत असतात. वर पुरावा मागतात त्या परमेशाच्या अस्तित्वाचा! जणू काय तो विधाता आपले आय कार्ड घेऊन भेटणार आहे! काय पण! पण सत्य बदलत नाही ना.. मला त्याने स्वत: दिले दर्शन!
माझ्या या साध्या भाषेवर जाऊ नका.. जड आणि क्लिष्ट आध्यात्मिक भाषा ही मी वापरू शकतो. पण नाही.. आपले लोक आहेत. त्यांना साधी भाषाच समजते. नाहीतर काय.. त्या प्रसन्न सुप्रभाती माझ्या अंतर्मनाचे चक्षु उघडले.. त्या नयनांसमोर उभा ठाकला तो परम ईश्वर.. अनादि अनंत.. करकटावरी ठेवूनिया.. माझे गळून पडले मी पण .. हे जगन्नियंत्या.. असे कोणते पुण्य या पामराचे की तुम्ही प्रत्यक्ष दर्शनाची कृपा करावी या नश्वर माणसावर? असेही काही नसते म्हणू शकलो मी?
तर तुम्हाला सांगतो काल ईश्वर दर्शन..तेही याचि देही याचि डोळा! अलौकिक.. डोळे निवले माझे त्या दर्शनानी!
काही पुण्यात्म्यांनाच घडते हो हे दर्शन. म्हणजे कळले असेलच काही थोड्यांनाच का दिसतो हा ईश्वर!
आणि मलाच दिसला .. अर्थात त्याला ही  कारण हेच!
म्हणजे तसे नवल नाही.. माझे आचरण शुद्ध.. विचार शुद्ध.. आचार शुद्ध.. माझा  मी पणा कसा गळून गेलाय पहा. अजिबात मला कसला नाही मोह..षड्रिपूंपासून अलिप्त..पुण्यात्मा मी ..  माझ्यासारख्याला त्या विधात्याने दर्शन द्यावे यात आश्चर्य ते कसले?
माझ्या सांगण्याच्या पध्दतीवर नका जाऊ..
अहो प्रत्यक्ष ईश्वर दर्शन ज्यास झाले त्याने काय करावे? सर्वांस ते पुण्य वाटून टाकावे.. हाच उदात्त विचार मनी माझ्या. पाया पडाल माझ्या तर तो नमस्कार पोहोचेल प्रत्यक्ष भगवंतास बरे! पडा पाहू पाया आणि पुण्य कमवा ..
जय जय रामकृष्ण हरी..
जय जय रामकृष्ण हरी ..

२३

**मी आणि माझे नशिब!**

तुम्हाला सांगतो नशिबावर माझा जेवढा विश्वास आहे ना तेवढा कशावरही नसेल!

नाही पटत तुम्हाला?

न पटो!

लहानपणी खेळताना आम्ही कोणी जिंकला की त्याला चिडवत असू..
अल्ला मेहरबान तो गधा पहलवान! म्हणजे नशिबाची साथ असेल तर काहीही होऊ शकते!
ही माझ्या लहानपणची गोष्ट..
म्हणजे या नशिबाला मी कित्येक वर्षापूर्वी भेटलो.. किंवा थोडक्यात हे नशीब आपल्या नशिबी जन्मापासून चिकटलेय म्हणायचे! कशी नशिबाने थट्टा आज मांडली .. असे पिंजऱ्यातले हृदय पिळवटणारे गाणे असो.. नशीब कोणाची मांडत असेल थट्टा.. कोणाची नसेल!

काय खरेय की नाही?

काय म्हणता.. तुमचा नाही विश्वास? नसो..

नसते एखाद्याच्या नशिबात असा विश्वास ठेवणे त्याला तुम्ही तरी काय कराल?
ज्याचे त्याचे नशीब!
काही म्हणा..
नशीब चांगले माझे की माझा नशिबावर आहे विश्वास..
श्रद्धाच म्हणा हवे तर!
खरे तर ती सटवाई येऊन ललाटरेखा जाते लिहून तेव्हा नशिबाने मी जागेवर होतो .. म्हणजे कुणी मला उगाच कडेवर घेऊन इकडेतिकडे 'अले माजा शोन्या..' असे बोबडे बोल ऐकवत फिरवत नव्हते!
आता हे मला कसे माहिती म्हणता?

तर ते माझ्या या असल्या नशिबवान असल्यामुळे लक्षात येते मला!
म्हणजे पहा..

रोज सकाळी उठता उठता हातात चहा.. काम विशेष नाही.. नुसता पगार .. असली सरकारी नोकरी.. माझे सर्व सांभाळणारी पत्नी.. विशेष काही न करता आयुष्यभर मिळालेले हे स्थैर्य .. हे सारे खरेतर सांगण्यासारखे नसते.. उगाच कुणाची दृष्ट लागायची!

पण नशीब माझे दैव असे बलवत्तर आहे! काही हात पाय न हलवता खाटल्यावरी हरी देतोय.. जांभूळ तोंडात टपकतेय आपोआप.
अजून काय हवे?
नशीब लागते असे नशीब असायला!
तुम्ही मानत नाही.. नका मानू ..
पण आहे हे असे हे खरे!

तर नशीबावर अवलंबून राहणे हा माझ्या आयुष्याचा खरे तर पाया आहे.
मला काय वाटते ना की हा सारा एक रहस्यमय चित्रपट आहे..
दैवाने नियोजित.. सटवाईने लिखित.. काळाने दिग्दर्शित आणि आपल्याला माहित नसलेला!
त्या नशिबाच्या रहस्यास काय कोणी बदलवू शकणार आहे?
माझी आई छान वाक्प्रचार वापरायची.. नाकाच्या शेंड्याला जीभ लावून पहा तर! मी आईच्या वचनाबाहेर थोडीच आहे?
उगाच नशिबाच्या नाकाला जीभ कशाला लावा नि त्याच्या बाहेर जात त्याला जीभ दाखवत वेडावून कशाला दाखवायचे? ठेविले अनंते तैसेचि रहावे.. संतादि मंडळींना काही वेगळे सांगायचे असेल त्यातून तर असो..
मी मात्र शब्दश: ठेविले तैसे रहातोय..

माझे नशीब थोर ..
दैव बलवत्तर..
की माझा त्यावर अढळ विश्वास..
मला आजवर माझ्या हरीने आधी म्हटले तसे खाटल्यावरी दिले आहे!

आणि खरे सांगायचे तर..
ती खाट पण त्याच नशिबाने पुरवली आहे!

२४

**आले महाराज..!**

पाहू देत बसायची काय व्यवस्था केलीय गुरूजींसाठी..
अरे टाक ते पवित्र आसन खाली.. बैठकीवरती..
गुरूजी असे कुठेही बसत नाहीत.
त्यांना त्यांचे ते पवित्र आसनच हवे. कळलं ना.
नाही चूकून टाकाल दुसरे कुठले नि महाराज कोपले ना तर..
अरे शीघ्रकोपी आहेत गुरूजी.
ते अशा तशा आसनावर बसतील?
त्यांचा मोडलात ना जर नेम तर त्याचा नाही काही नेम आणि काही खरे नाही तुमचे.. उघडतील चौथा चक्षु..
हो.. तिसरा नेत्र शंकर भगवानांचा .. त्यांनीच स्वत: कैलास पर्वतावर दिला महाराजांना तो.. बरे ते राहू देत.. नीट व्यवस्था आहे ना केलेली..
म्हणजे आता महाराज आसनस्थ होतील. मग पुढील पंधरा मिनिटे ध्यान.. चक्षु मिटून.. तुम्हा आम्हाला असतात ते डोळे .. महाराजांना आहेत ते चक्षु बरे.. तर ध्यानानंतर मग क्षीरप्राशन.. कच्चे..
दूध नव्हे क्षीर.. दूध पितो ते तुम्ही आम्ही सामान्य.. तर क्षीर आहे ना गोमातेचे? पावशेर.. त्यात थोडे गाईचे तूप.. त्याबरोबर मोजून पंचवीस मनुका..बिनबियांच्या.. साडेसात बदाम सात तास पंचवीस मिनिटे पाण्यात भिजवलेले.. नि नऊ काजू.. खारवलेले नकोत.. आणि साल काढलेले हवेत. त्याबरोबर साडे तीन केळी आणि सव्वाअकरा द्राक्षे.. इतकी न्याहारी झाली की महाराज निद्रिस्तावस्थेत ध्यानधारणा करतात. गुरूजींचे सारे कसे एका शिस्तीतच चालते. उगाच नाही या वयातही तेज:पुंज दिसतात..
या वयात म्हणजे?
लावा अंदाज..

पंच्याहत्तर .. ऐंशी ..?
नाही हो..
गुरुजी आता आहेत एकशे पंच्याणव .. काही वर्षांतच द्विशतक.. होईल
ना..  आम्ही भक्तगण करू मोठा सोहळा! महाराजांचे सारेच कसे भव्यदिव्य मग
तो सोहळा पण तसाच नको का?
काय म्हणता? महाराज वाटत नाहीत इतक्या वयाचे?
तेच म्हणतो मी.. सिद्ध पुरूष ते.. त्यांचे वय काय त्यांच्या शरीरावर दिसणारे?
नाहीच दिसणार.. नुसते हिमालयातच  गुरूजी पन्नास वर्षे तप करत होते.
तिथून  इथे त्यांचे भक्त त्यांना ओढून घेऊन आलेत!
नाही पटत?
न पटो.. असे पण पाखंडी तुम्ही! देवाधर्माचा तुमच्याशी काय संबंध? असे
साधुपुरूष आहेत म्हणून हा दुस्तर भवसागर तरत आहोत आम्ही .. आणि तुम्ही
सुद्धा!
आणि त्या कुंभमेळयाची गोष्ट!
महाराज हिमालयातून आले तेच  कुंभमेळयासाठी.. तिथे त्यांची बाकी
आखाडातल्या साधूंबरोबर जुंपली..
काय म्हणता?
रागलोभ जिंकून घेतला पाहिजे हा उपदेश महाराजांचाच आहे .. आहेच.
तो तुम्हा आम्हा मामुली लोकांना लागू .. अध्यात्मिक उन्नतीच्या पायऱ्यांवर
कितीतरी म्हणजे लाखो करोडो मैल पुढे असणाऱ्या महाराजांना हे मर्त्य मानवाचे
नियम लागू कराल?
काय म्हणता..
महाराज मर्त्य नाहीत का?
नाहीत.. चिरंजीव आहेत..
आजवर कोण आलेला परत नाही गेला? खरंय तुमचे..

इथेच दिसते ते त्यांचे अलौकिकत्व!
उद्या आम्ही नसू .. तुम्ही नसाल .. पण महाराज असतील.. सर्व जगाची काळजी वाहात!
चला आटपा लवकर.. आले वाटते महाराज..
धन्य धन्य झालो.. काय ते तेज पहा..
या महाराज बसा.. आसनस्थ व्हा.. नमस्कार करतो.. स्वीकार व्हावा..

२५

**बैठक!**

होय होय ..
बसूयात उद्या.
चालेल ना तुम्ही या.
हो त्यांच्याकडचे असतील कोणी.
कोणी का असेनात आपल्याला काय.
हो की नाही?
अहो बोलूनचालून आपली बाजू वरचढ.. आणि आपला मुलगा पण कसा..
खणखणीत बंदा रूपया..
ऐकणार नाहीत म्हणजे?
झकत ऐकतील.
अशा तशात सोडते की काय?
त्यांना काय सारे स्वस्तात पटवायचे की काय? नाही मी काय म्हणते ना..
काटकसर नको तिथे कशाला? रीतभात नको पाळायला?
नाहीतर अशाने लोक शेण घालतील शेण. छे हो..
आपल्याला काय जास्त काही नको. आपल्याला काय कमी आहे का?
पण तेवढे एक मानपान व्यवस्थित व्हायला नको? आपण काही बोलणार नाही म्हणून .. उगाच ढील देऊ नका. मामांना घ्या.
आमचे हे..
अजिबात तोंड नाही उघडणार हो.
ते म्हणाले ना मुलगी नि नारळ तर त्याला पण देतील मान्यता.
त्यामुळे तिथे मीच हवी खमकी.
उगाच कोणाचे ऐकायला नको.

आणि आमच्या सुलूच्या लग्नात नाही का केला आम्ही खर्च? रुखवत काय..
मानपान काय.. विहीणबाईंच्या साड्या काय.. नवऱ्यामुलाचे कपडे.. सगळे आ वासून पाहात बसलेले. कोणाला बोलायला जागा ठेवली नव्हती हो.
मग आता बरे सोडीन. आपली बाजू वरचढ असताना कोणाची मिजास नाही चालायची.
माझे ऐका ..
तुम्ही पण याच.
बोलणी करायला तुम्ही हव्यातच. रीतभात सोडून कुठे चालते होय.
आणि मी काय म्हणते..
हे सगळे आपल्या पूर्वजांनी सुरू केले.. त्याला शास्त्रीय आधार असल्याशिवाय का? आणि आपण कोण त्यात दीडशहाणपण दाखवणारे?
तुम्हाला सांगते त्या कुमुदच्या लग्नातला सावळा गोंधळ. कोणाचा पायपोस कोणात नाही. उगाच प्यायला पाणी मागितले तर ते देखील नाही. जास्त काही मागत नाही हो आपण पण कमीतकमी व्यवस्था हवी ना? करा नीट अरेंज.
आणि आम्ही वऱ्हाडी येऊ ते एसी बसनेच. उगाच या उकाड्यात घामाने हैराण नि पोहोचण्याआधीच अर्धमेले होऊन जाऊ.
हो की नाही?
तर साड्या नि नवऱ्या मुलाचा बस्ता..
नि गळयातील हार.. अंगठी अगदी रीतिरिवाजानुसार होईल.
गाडी? बघू ..
पण बाईकची भारी हौस हो..
हो ना तरूणवयात असते.
आणि दिली बाईक तर मागे बसून मिरवणार कोण? तुमची मुलगीच की नाही?
तो काय आपल्याला घेऊन फिरणार आहे?
नाहीतर काय..
उगाच आपले हे नाही ते नाही ऐकून नाही घेणार मी. सांगून ठेवते. हो नाहीतर भर बैठकीत उगाच गोंधळ नको.

तुम्ही पण करून ठेवा नीट विचार.. काय आहे उगाच शेवटच्या क्षणी हे राहिले ते राहून गेले मागायचे असे काही व्हायला नको.. हो की नाही?
नाहीतर मी कशी नीट लिस्टच बनवून ठेवते.. मग वन बाय वन संपवू..
हो ना? चला उद्या मेन काम आहे.. बैठकीचे..

२६

**ऐका ना माझे जरा..**

काय कसे काय ..

दचकलात?

माहितीय तुम्ही घाबरता मला..
म्हणजे आता घाबरताय.. काही दिवसांपूर्वी नव्हता घाबरत.. जिवंत होतो ना तेव्हा!
तुमच्यात काय ..
मृतात्म्यांना घाबरतात.

तुमच्यात?

अर्थात तुमच्यातच.. इथे परलोकवासी होऊन झाले काही दिवस मला.. सारे काही छान आहे.. म्हटले एकदा विचारपूस करावी..

काय म्हणता?

कशाला असली नस्ती उठाठेव?

अहो काय आहे आलो अचानक निघून.. सारे अर्धवट सोडून.. थोडी रूखरूख थोडी हूरहूर लागणारच की नाही? काहीच थोड्या दिवसांपूर्वी मी तुमच्यातलाच एक होतो.. मर्त्य .. आता झालोय अमर्त्य खरा पण इतक्या वर्षांची सवय.. ती जाते का? त्याला कोणी नाक खुपसणे म्हणो..  खुशाल म्हणा..

फक्त माझ्या या आताच्या अवताराला नाक आहे का .. एवढे तपासून पहा!
म्हणजे मी तसा पाहू शकत नाहीना म्हणून!
काय म्हणता..

मी भूत झालोय का?

भूत नाही पण भूतकाळ नक्कीच झालोय..
तांबे भेटले.. म्हणाले.. काय मी म्हणालो होतो ते खरे ना.. जन पळभर म्हणतील हाय हाय.. होय की नाही..

तेच जरा पाहावे म्हणून डोकावत होतो..
काय आहे ..
तसे मी ऐकले होते..
मी गेलो ना तर काही लोक कसे अगदी गडबडीत होते.. ते एक कोणी म्हणाले.. एकदाचे मोकळे करा.. तिथून सुरूवात झाली! मग माझ्या त्या श्राद्धाच्या घनघोर चर्चा.. दोन्ही मुलांत पैशांवरून म्हणजे खर्च कोणी करावा यावरून भांडणे.. हे त्या तेरा दिवसांच्या आत..
मी मुक्ती मिळून आलो खरा..
आता काय काय होईल..?
म्हणजे तसा गडगंज नाही पण बरी मालमत्ता सोडून आलोय.. निढळाच्या घामाची.. अचानक आलो तर या पोरांनी काय केले त्याचे ते पहावे म्हटले..
तरी ते रामराव म्हणत होते..
तेच ते आपले मित्र..
ते मागील वर्षी आले इथे ..
म्हणाले नका जाऊ पहायला.. आता काय पडणार आहे फरक..आणि बघून बघून काय बघणार.. भांडणेच ना?
तरी आपली एक उत्सुकता असते ना .. आलो झाले..
रामरावांना न बघता कसे दिसले असेल..

तर काही असो..
मी आलो होतो ते निरवानिरव करायला.. मोठ्याच्या स्वप्नात गेलो .. तर कसा घाबरून ओरडत उठला.. छोट्याच्या गेलो तर तो बोंबलत सुटला.. काही झाले तरी पोरे माझी ती.. उगाच हैराण कशाला करा.. सोडला नाद.. म्हटले जावे परत! तर तुम्ही दिसलात..
म्हणून मन मोकळे करावे म्हटले.. ऐकताय ना?
अरे ..
हे काय तुम्ही पळून चाललात..
आठवतेय मी तुमचा मित्र.. तुम्हाला उधार दिलेले ते पन्नासहजार.. नाही ते घ्यायला नाही हो आलोय..

पण ऐकून घ्या ना..
कुठे धावत सुटलात..

ऐका ..
ऐका माझे जरा..
ऐका ना जरा ..

२७

**माझ्या कविमनाची व्यथा!**

नमस्ते!
या रसिकांनो या..
मला ठाऊक आहे तुम्ही माझी कविता ऐकायला नाही आलात. तसे तुम्ही माझे भाषण ही ऐकायला नाही ना आलात! पण तरी मी तुम्हाला रसिकच मानतो आणि म्हणतो. कारण मला भेटलात तर कविता ऐकवीनच ना मी.. तेव्हा रसिका.. आता भेटलोच आहोत तर या कविराजाच्या मनची व्यथा ऐका..
काय म्हणता? मी कोण?
अहो माझी काय द्यायची ओळख ती. मीच तो..
चंद्रावरती जाऊनी चांदण्या
खुडणार मी
किरणांवर बैसूनी रविला गुदगुल्या करणार मी
सागराच्या तळाशी शंख शिंपल्यांना
वेचीन मी
अन हिमालयाला खोदुनी कस्तुरी
आणेन मी
... हसू नका.
हे आम्हाला मिळालेले लायसन्स आहे बरे!
कुणी दिले काय विचारता?
देवाने ..
देवाने दिधले जगत हे आम्हास खेळावया..
कारण आम्ही असू लाडके!

पण काय आहे ना तुम्हाला आम्ही खायला काळ अन भुईला भार वाटतो असे तुमच्या बोलण्यावरून वाटते..

अहो..

शब्दांचा नाद नादवतो आम्हा..
फुलांचा गंध वेडावतो आम्हा..
कुणी म्हणे कवी कुणी कविराज..
पण या जगातील एकेक ... खुणावतो आम्हा..!

आम्हाला या जगाच्या नियमांची काय तमा..
यमकांच्या यमनियमांची असते आम्हा ..

हे गाळलेले शब्द सुचले की पूर्ण करीन ही  वाक्ये .. म्हणजे ओळ!
आणि खरे सांगतो..
नच जमले तर सगळा घोळ!

तर हे असे आहे बघा.

देवाने लाडाने बनवले आणि आम्ही त्याचे असू लाडके हे खरे.. त्याच्या इच्छेनुसार  जगत हे सुंदर करायला आलो आम्ही.. पण सांगू तुम्हाला किती कठीण काम ते..

कधी कल्पना सुचते तर शब्द नाहीत.. कधी शब्द सुचतात नुसतेच तर कल्पना नाहीत..
नुसत्या शब्दांचे काय बनवायचे?
मनोरे की ताजमहाल?
शोधीतो त्यात कविकल्पना..

न सापडल्यास होतील हाल!

हसताय? हसा बापडे ..

पण आहे हे असे आहे..
खरेतर हे असे आहे..
कल्पनांचे हातपाय शब्दात जखडल्याशिवाय नाही मिळत कविमनाला शांती..
आणि योग्य शब्द मिळण्याची दिनरात पडते कविमनास भ्रांति..

त्यात परत हे व्यवहारी जग..
शब्दांचा पाडून कीस मागेल मग..
कुणी न जाणे कशी ती
कविमनाची होई तगमग..

काय ती पैशाची माया काय तो अहंकार.. अहो थकून जातो मी या जगाच्या भांडणात. कसे जगावे या निष्ठुर दुनियेत माझ्यासारख्या कविमनाच्या व्यक्तीने? कोथिंबीरीची जुडी आणि कोबी बाजारातून आणण्यास का झाला जन्म माझ्यासारख्या कवीचा?
कुणास प्रश्न पडतो श्रेयसाचा
आणि
कुणास प्रेयसाचा..
पण खरे ते सांगतो..
नाही राहवत आम्हा खमक्यांना.. यमकांच्या शिवाय..
आणि नाही जमली जोडी तर .. जोडी म्हणजे शब्दांची जोडी ..
ज्यांची असते आम्हाला गोडी..
तर शब्दांच्या सागरात पोहून प्रवाहात.. शोधतो शाब्दिक मोती आम्ही मारून पायहात ..
आणि तेच नाही गवसले कधी तर.. आम्ही बेचैन दिनरात!

तुम्हांला कधी दिसलाय समाधानी कवी.. आकंठ बुडलेला तृप्ततेत?
तर देवाने बनवले लाडाने पण..
देऊन ठेवलाय हा अतृप्ततेचा शाप.. त्यातून सोडवील कोण..
आकाशातला बाप?

२८

**मी आणि चूक.. अशक्य!**

काय मग..
तोडला ना तो कप?
मला माहिती आहे ..
काळजी म्हणून घ्यायची नाही..
तोडफोड सगळीकडे..
काय?
माझ्या हातून फुटला तो?
नाही म्हणजे पडला धक्का लागून माझा.. पण तो तिथे ठेवला कुणी?
मीच?
असेल ही मी ठेवलेला..
पण मुळात त्यात चहा होता..
काय ? मीच सांगितलेला बनवायला?
पण तो कुणी केलेला?
आता कसे..
चहा केला नसता तर कप नसता ..
मग तो इथे नसता..
मग तो धक्का लागला नसता..
मग तो कप पडला नसता..
मग फुटण्याचा प्रश्नच नसता..
कळतंय ना मी काय म्हणतोय ते..
म्हणजे काय आहे मूळ कोणाची चूक हे पाहणे जरूरी हो..
तशी मुळात मला प्रश्नाच्या मुळाशी जाण्याची सवयच आहे..
काय म्हणे..?

चहा करायला मीच सांगितले..
असेल ही ..
नाही मी सांगितले हे खरे..
पण याचा अर्थ हा तर नाही की तो चहा कपातच द्यायला हवा?
नाही म्हणजे स्टीलच्या ग्लासातही पितात चहा..
खरे सांगतो..
तो याच कपात गाळण्याची काही जरूरी होती का? नाही ना?
दुसरा कुठला घेतला असता तर हा नसता ना फुटला..
काय ?
दुसरा फुटला असता?
तेच सांगतोय..
हा नसता ना फुटला..
मग आता या फुटलेल्या कपाच्या नावाने ओरडण्यात काय अर्थ आहे?

आणि महत्वाचे..
चूक माझी नाहीच..

भले मी तो कप तिथे ठेवला असो..
भले मीच तो कप तिथे ठेवला असो..
भले धक्का माझा लागला असो..

कारण काय आहे..

माझे कधी काही चुकते का?
नाही.. नाहीच..
माझे नेहमी बरोबरच असते..

बरोबर की नाही?

मी कशाला विचारतोय ..
मला माहिती आहे ना..
माझे नेहमी बरोबर असते ..
माझे नेहमी बरोबरच  असते..
माझे नेहमीच बरोबर असते ..
माझेच नेहमी बरोबर असते ..

२९

**मुखवटा आणि चेहरा!**

काल आरशात पाहताना पाहिले तुला! आरशातला सेल्फी म्हण पाहिजे तर.
किती खूश होतास रे तो बाहेरचा तू..
पण काल आरशातला ही आनंदात होता..

का?

काय तरी घोटाला दिसतोय रं..

घोटाळा कसला..

खरेतर घोटाळाच म्हणावा का?

कारण तू आरशात कधी खूश दिसत नाहीस.
म्हणजे मी तरी नाही पाहिले तुला तसे. पण काल मात्र तू होतास तसा..
खूश!
आरशातला तू आणि आरशाबाहेरील तू दोघेही सारखेच होते काल..

पण एरवी यांच्यात एवढा फरक कसा रे? तसे त्या बाहेरच्याला मी नेहमी हसतानाच पाहिलेय..
मग तो आरशात असा का असतो?
कधी उदास कधी दुर्मुख..
कधी स्वतःशीच नाराज तर
कधी कष्टी तर
कधी दु;खी?
त्यालाही हसताना पाहणे एवढे दुर्मिळ का रे?

मान्य आहे याने जगाच्या बाजारात खाल्ल्या असणार ठोकरा..

पडून झडून झाला असणार हैराण
आणि परेशान..
जगाच्या व्यवहारात खाल्ले असतील टक्के टोणपे..
पण त्या प्रतिमेने त्याचा इतका बाऊ करावा रे? नाही .. तसा तिचा हक्कच आहे..
दर्पण कधी खोटे नसेल ही बोलत.. पण तो खराखुरा मी?
तो आहे का खोटारडा?
असणारच..
कारण सदैव वर तोंड करून हसत असतो तो!

पण काय आहे ना त्या मुखवट्यास  मुखवटा तरी कसे म्हणावे रे?
उद्या सारेच असे आपले दैवाचे धक्के नि जीवनसंगराच्या जखमा वागवत रडत राहिले  ना तर..
हे जगच असे दुर्मुखलेले बनून राहील..

तेव्हा तो मुखवटाही हवाच..
हो की नाही?
आणि त्या मागचा चेहरा..
ती प्रतिमा?
सत्याची जाणीव करून द्यायला ..
तो ही हवाच!

पण खरे सांगतो..
असाही येतो एखादा दिवस..
जेव्हा दोघेही असतात हसरे..
दोघांच्या चेहऱ्यावर विलसते समाधान.. तसा तो एक कालचा दिवस जेव्हा तुम्ही दोघेही दिसत होतात आनंदात..

अधिक काय सांगू..

असे दिवस येवोत वारंवार..
आणि काय?

३०

## चिंग्या महिन्याचा होत नाही तोच

अपत्य प्राप्तीचे सुख काही वेगळेच असते खरे. अपत्य म्हणजे मुलगाच बरे. म्हणजे आम्हाला हे काही पहिलेच अपत्य झाले असे नाही. आम्हाला पहिली मोठी कन्या आहेच पण आपला म्हणावा असा तो म्हणजे मुलगाच नाही का? यावेळी तरी मुलगाच जन्मला म्हणून कसे सारे धन्य वाटले. खरे सांगू का तर आपली पुण्याई फळाला आल्या सारखे वाटले आम्हाला. मागच्या वेळेचा आईचा सारा रुसवा कसा क्षणात नाहीसा झाला. मला अजून आठवतेय आमची सुकन्या जन्मली तेव्हा आईने रडायचे बाकी ठेवले होते. साहजिकच आहे. शेवटी आपल्या संस्कृतिचा प्रश्न आहे हा. आपण नाही तर कोण पाळणार? अर्थात यावेळी पुत्ररत्न झाले ते काही एवढ्या सहजपणे नाही. सरकारने काय काय बंद्या आणल्या, सोनोग्राफीवर काय आणि याच्या त्याच्यावर काय. बंदी आणली तर त्या डॉक्टरांनी आपले भाव आणखीन वाढवले. खर्च खूप झाला, म्हणजे या आधी दोन वेळा पाहिले, त्या मुली जन्मल्या असत्या तर? अर्थात त्यांच्या लग्नातला खर्च आणि हुंडाबिंडा पकडला तर ती डॉक्टरांची बिलं परवडली म्हणायची. अर्थात हे आपलं तुमच्या आमच्यातलं सिक्रेट, कारण आपली मतं जुळतात म्हणून, कोणाला सांगू नका, नाहीतर नसती आफत. असो. शेवटी पुत्रप्राप्तीचे सुख नशिबात आहे म्हणायचे एवढेच.

मुलाबद्दल माझी काय काय स्वप्नं आहेत. पुत्र व्हावा ऐसा गुंडा म्हणतात. तिन्ही लोकी हा नक्कीच झेंडे रोवेल बघा. नक्कीच. आज असेल महिन्याचा खरा पण पाहता पाहता मोठा होईल. एवढा मोठा की गुंडा होईल. अगदी झेंडे गाडेल. आमच्या शेजारचे आहेत ना रामभाऊ त्यांचे सांगतो. त्यांना चार मुलींमागे मुलगा झाला. त्यांच्या वेळी आज सारखी डॉक्टरांची मदत नसायची. पाचव्या खेपेला मुलगा झाला तसा रामभाऊंनी जल्लोष केला. पेढ्यांवर थांबले नाहीत तर अख्ख्या आळीला जेवणच घातले. त्यांचा तो उत्साह मला आजही आठवतो. काय

तो आनंद ! चार मुलींनंतर सुखाचा शिडकावा ! आता चौघींची लग्नं झाली. मुलगा अगदी नावाप्रमाणेच गुंडा किंवा गुंड झाला. आता आमच्या एरियातला दादा म्हणून फिरतो. आज बाप हयात असतानाच त्याने त्यास बाहेर काढले घरातून आणि घरावर हक्क सांगितला. बिच्चारे रामभाऊ ! येऊन जाऊन आपल्या चार पैकी एका मुलीकडे दिवस काढताहेत. शेवटी मुलीकडे दिवस काढावे लागावे यासारखे दु:ख नाही. या जिण्याचा त्यांना खेद होतो. अजून एखादा मुलगा असता तर अशी वेळ त्यांच्याचर आली नसती. कदाचित त्याने तरी सांभाळले असते असे ते मुलींना सांगतातही. मुली मायेने करतात त्यांचे पण रामभाऊंना मुलांचे कौतुक फार. तर सांगायची गोष्ट, मुलगा तो मुलगाच. अशा पुत्र प्राप्तीचा आनंद आम्हा सर्वांना होणं अगदी साहजिकच आहे की नाही? पहिली बेटी असेल धनाची पेटी पण कितवाका असेना बेटा धनाचा पेटाराच असतो नाही का?
मी ठरवून टाकलंय, याला डॉक्टर करून टाकणार मग अगदी घरचा वैद्य, उगीच दवाखान्यात लायनी लावायला नकोत. नाहीतर इंजिनियर तरी, चांगला सहा आकडी पगार मिळतो म्हणे त्यांना. नाहीतर करेल एखादा मोठा बिझिनेस. अर्थात तो मोठा होईल तेव्हा कशाची चलती असेल त्याचे करेल करियर. आज डॉक्टर इंजिनियराला आहे बक्कळ भाव, चिंग्या मोठा होईल तेव्हाचे कोणास ठाऊक? शेवडी मुलगाच तो. धनाचा पेटार घेऊन आणेल कोणत्या तरी मुलीला घरी. तोवर आमच्या सुकन्ये ( सुकन्याच तिचे नाव आहे बरं ) चे लग्न आटोपले असेल त्याच्या आधी. तिच्या लग्नात मात्र माझा हुंड्याला सक्त विरोध असेल. मुलीची बाजू झाली म्हणून काय झालं? समाज सुधारायलाच हवा की नाही? चिंग्याच्या लग्नात मात्र सारंकाही प्रथेप्रमाणे यथासांग व्हावं म्हणने झालं. त्यात देणंघेणं काय, हुंडा नि मानपान काय. रीतीबाहेर मी नाही. आपल्या पूर्वाजांनी पाडलेल्या प्रथा आहेत त्या. आपली संस्कृती आहे ती. आपण नाही पाळणार तर कोण पाळणार?
मुलगा झाला म्हणजे कसा वंशाचा दिवा पेटल्या सारखा वाटतो. कृतार्थ झाल्यासारखं वाटतं. मुलगाच आता आपल्याला मुक्ती देईल. अंत्यसंस्काराला तोच तर पुढे येईल. बाकी रामभाऊंच्या मुली त्यांना आयुष्यभर भले सांभाळतील

पण शेवटी मुलगाच त्यांना मुक्ती देववेल की नाही. काही तर आईबापांच्या जिवंतपणीच त्यांना मुक्ती मिळेल तर बरं अशीही व्यवस्था करतात. शेवटी काय मुलगा तो मुलगाच. उगीच नाही पूर्वी लोक आशीर्वाद द्यायचे अष्ट्पुत्रा सौभाग्यवती भव म्हणून, म्हणजे एक नाही तर दुसरा कोणी कामाला येईलच. कोणी अष्ट्पुत्री सौभाग्यवती म्हटल्याचं ऐकलंय कुणी? चिंग्याची सर सुकन्येला कशी येणार?

३१

**मी एक फायटर..**

मला ठाऊक आहे..
मी जन्मतःच एक फायटर आहे ते.. आईच म्हणते ना तसे.
मी आले ना जगात तेच मुळात कशी?
मी पाहात होते ना आईच्या पोटातून..

किती नाही प्रयत्न केले मी कोण ते शोधण्याचे सांगू..
डॉक्टर काय .. वैद्य काय.. वैदू काय..
काय काय नाही केले.
एखाद्याच्या जन्माचा असा शोध होत असेल असे कधी वाटलेच नसते मला नाहीतर. आध्यात्मिक लोकांना प्रश्न पडतो.. मी कोण? तसा प्रश्न पडलेला.. माझ्या आईच्या पोटात कोण ?

मी आईच्या पोटात असतानाच काय काय नाही शिकले..

आजीच्या बोलण्यातून कळायचे..
माझी ती मोठी बहीण.. रागिणी.. तिचे नाव अवदसा आहे असे मला कित्येक दिवस वाटायचे कारण आजी तिला अवदसा अशीच मारायची हाक.
त्यानंतर माझ्या स्वागताची तयारी.
आई मला पोटात घेऊन इकडेतिकडे जायची.. तेव्हा ही ती हात फिरवायची पोटावरून तेव्हा तिची माया ओसंडून वहायची त्या स्पर्शातून..

पाठी आजी आजोबांचे तुणतुणे वाजत असायचे. मी आल्यावर आईलाही ते बघून घेणार होते म्हणे. म्हणजे काय करणार? आईलाही म्हणजे? मलाही बघून घेणार ते? म्हणजे काय?
माझ्या स्वागताची असली जय्यत तयारी सुरु हे पोटातूनच कळले मला.

एकदा त्यांना बोलताना ऐकलेही मी.. परत एकदा मुलगी आली तर..
यावर आजोबा म्हणाले.. असे अभद्र नाही बोलू ..
मी येणार म्हणजे अभद्र की काय?
पण मी मुलगा आहे की मुलगी हे मलातरी पोटात थोडीच समजते..

मग एकदा झाले भांडण..
आजी आजोबा नि माझे वडील..
आई प्रेमाने हात फिरवायची.. आणि वडलांच्या आवाजातच मला माया समजायची.. दोघे माझ्या येण्याची वाटच पाहात असावेत.

मग कशी का असेना मी आलेच शेवटी या जगात.
आईच्या पोटातली ऊब संपली..
मी फोडला पहिला टाहो..
मग मस्त जांभया देत ताणून दिली..
मग काही वेळात काय झाले सांगू..
आई जवळ झोपलेली.. थकली भागली. अगदी निरागस दिसत होती ती ..
मग कुठूनतरी आजी आलेली माझ्याजवळ.. तिचा स्पर्श .. काहीतरी विचित्र वाटला.. मग काय कोणास ठाऊक पण गळयावर कसला तरी दाब जाणवला मला.. आजीचाच तो हात.. माझा श्वासच जरा अडखळला.. मग मी कशीबशी जोरात रडले.. त्या पाठोपाठ कसला तरी मोठा आवाज.. माझ्या बाबांचा.. त्यांनी मोठ्या प्रेमाने उचलून धरले मला.. का कोणास ठाऊक कापत होते ते अंतर्बाह्य.. त्यांनी काय ओरडाआरडा केला.. आजी नि आजोबांना हाकलून लावले असेच

वाटले मला.. तेवढा तो गळयावर पडलेला हात.. गुदमरलेला श्वास.. मग बाबांचा स्पर्श..
मी जिंकले होते..

म्हणजे जन्मले ही आणि जगले ही.
म्हणजे मी एखाद दोन दिवसांचीच असेन तेव्हा..

आता आई म्हणते माझी बाई ती.. झगडून झगडून आलेली.. एकदम फीट आहे म्हणे मी..  देवाने तारलेली मी.. आई रागिणीला लाडाने रागू म्हणते.. म्हणजे तिचे नाव अवदसा नाहीच..
आजी आजोबा कुठे गेले कोणास ठाऊक.. पण मला तसले ते अवदसा वगैरे नाव नाहीच पडले कधी..
उलट मी माझ्या बाबांची पण कशी लाडकी झाले..

आज माझा पहिला वाढदिवस..
एका वर्षाचा विचार करते ना..
तर कितीतरी जग माझे आधीच पाहून झालेय..
अजून धड चालता येत नसले तरी..

**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई येथे छातीरोग तज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने आणि त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत.

डॉक्टरांचे नेहमी दिवाळी अंकातून विनोदी कथा प्रकाशित होत असतात.

त्यांनी लिहीलेली ९ पुस्तके ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रकाशित झाली आहेत. आपल्या वाचकांचा प्रतिसाद ऐकण्यास ते उत्सुक असतात. कृपया आपली मते त्यांना कळवा.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

## डॉ. नितीन मोरे यांची साहित्यसंपदा:

चक्रमादित्याचा दरबार(नाटक)

केल्याने शीर्षासन,

नाच जमूरे नाच,

अहम ब्रह्मास्मि,

मच्छर टाईम्स,

संवादोनी प्रकटावे

या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )

प्रेमातुराणां (नाटक)

चक्रमादित्याचा दरबार-२ (नाटक)

सांगतो ऐका ( एकपात्री नाट्यछटा)

ही सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहेकडे लक्ष नका देऊ. रडणाऱ्यां . मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार .दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं वर्षाला .अर्धाकोटी डाऊनलोड होतातवाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. . व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीतसुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासू .न ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशातरॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी . .थांबवू शकत नाही

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हाआपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात . ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवातुम्ही फ़क्त दहा व .ाचक आणाते . तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. .शंभर आणतील. आणि ते दहाहजार आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवाकिंवा .7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे.